| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक ०५ वा | गुरूवार दिनांक ०५ मार्च, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### सोलारपॅनलच्या स्टार्टरची चोरी

तामलवाडी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नानासाहेब बळीराम शिंदे, वय ४० वर्षे, रा. मसला खु. ता. तुहजापूर जि. धाराशिव यांचे मसला खु. शिवारातील शेत गट ४११ मधील सोलार पॅनलचे स्टार्टर एकुण १५,००० किंमतीचे दि.२६.०२.२०२६ रोजी २०.०० ते दि. २७.०२.२०२६ रोजी ०६.०० वा. सु. अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला.अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-नानासाहेब शिंदे यांनी दि.०३.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तामलवाडी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) गुन्हा नोंदवला आहे.

### गौणखणीजची चोरी: गुन्हा दाखल

आंबी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत काका रा.तांदुळवाडी ता. परंडा जि. धाराशिव यांनी दि.२५.०२.२०२६ रोजी खैरी नदी पात्रातुन २० ब्रास वाळु गौण खनिज अंदाजे १,४०,००० किंमतीची शासनाचा कर बुडवून विनापरवाना बेकायदेशीर रित्या लबाडीचे उद्देशाने उपसा करुन स्वत:चे शेत गट नं ११ मध्ये तांदुळवाडी शिवार येथे साठा केलेला मिळून आला. अशा मजकुराच्या फिर्यादी धिरज काकासाहेब साळुंके, वय २५ वर्षे, व्यवसाय ग्राम महसुल अधिकारी सज्जा तांदुळवाडी रा. चिखली ता. जि. धाराशिव यांनी दि.०३.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आंबी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२), सह २१ (१), २१(२), खान आणि खनिज नियमआणि विकास अधिनियम१९५७ सह कलम ४८(७),४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल सहिंता १९६६ प्रमाणे अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### गाय-वासराची चोरी

ढोकी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे-दत्तात्रय शिध्देश्वर धुपेकर, वय २४ वर्षे, रा. तेर ता. जि. धाराशिव यांचे संत गोरोबाकाका मंदीर मधुन मंदीरासमोरील निरल हणुमंत एडके यांचे शेतातील गोठ्यावरुन अंदाजे ६५,००० किंमतीचेतीन गावरान गायी व एक लहान वासरु हे दि.२८.०२.२०२६ रोजी ०२.०० ते ०५.०० वा. सु. अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-दत्तात्रय धुपेकर यांनी दि.०३.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन ढोकी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### मोटारसायकलची चोरी

भुम(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी दशरथ देवीदास अंधारे, वय ३६ वर्षे, रा. रा. ओकार चौक भुम ता. भुम जि. धाराशिव यांची अंदाजे १५,००० किंमतीची मोटरसायकल ही दि.२५.०२.२०२६ रोज आरसोली ते भुम रोडवर कॅनलजवळुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. प्रथम खबरेवरुन भुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## शाळा, महाविद्यालये आणि बसस्थानक परिसरात ‘निर्भय’ व ‘पिंक’ पथकाची गस्त वाढणार

### धाराशिव शहर आता महिलांसाठी होणार अधिक सुरक्षित नगराध्यक्षा नेहा काकडे यांची पोलीस अधीक्षकांशी चर्चा



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- शहरातील महिला आणि मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असतानाच, प्रशासकीय पातळीवर आता मोठ्या हालचाली सुरू झाल्या आहेत. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या संकल्पनेतून शहरात महिलांसाठी निर्भय वातावरण निर्माण करण्यासाठी धाराशिवच्या नगराध्यक्षा नेहाताई राहुल काकडे यांनी पोलीस अधीक्षक रितू खोकर यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी शहरातील टवाळखोरांचा बंदोबस्त करण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यावर भर देण्यात आला.

शहरातील शाळा, महाविद्यालये, खासगी शिकवणी वर्ग (ट्युशन क्लासेस) आणि बसस्थानक यांसारख्या गर्दीच्या ठिकाणी मुलींना टवाळखोरांकडून होणारा त्रास वाढल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर, नेहाताई काकडे यांनी पोलीस प्रशासनाकडे खालील मागण्या मांडल्या. निर्भय पथक आणि पिंक पथकाची वर्दळीच्या ठिकाणी गस्त वाढवण्यात यावी, महिलांच्या तक्रारींची दखल घेऊन संबंधितांवर तात्काळ कठोर कारवाई करावी, महिलांमध्ये विश्वासाचे आणि सुरक्षिततेचे वातावरण निर्माण करण्यासाठी पोलिसांनी सक्रिय राहावे आदी विषयांवर प्राधान्याने चर्चा करण्यात आली.

पोलीस अधीक्षक रितू खोकर यांनी या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद दिला. महिला सुरक्षा हे पोलीस प्रशासनाचे सर्वोच्च प्राधान्य आहे. शहरातील असुरक्षित ठिकाणांचे सर्वेक्षण करून त्याठिकाणी पोलीस बंदोबस्त आणि गस्त अधिक प्रभावी केली जाईल, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्या संयुक्त प्रयत्नातून आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या नेतृत्वाखाली धाराशिव शहर महिला व मुलींसाठी सुरक्षित, निर्भय आणि विश्वासार्ह बनवणे हाच आमचा मुख्य उद्देश असल्याचे

नगराध्यक्षा नेहाताई राहुल काकडे यांनी नमूद केले आहे.या महत्त्वपूर्ण बैठकीला कळंबच्या नगराध्यक्षा सुनंदाताई कापसे आणि धाराशिव नगरपालिकेच्या महिला व बालकल्याण सभापती वैशालीताई सुशांत सोनवणे यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या संकल्पनेतून उचलण्यात आलेल्या या ठोस पावलामुळे शहरातील महिला सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रभावी उपायोजना आखली जाईल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## कळंब शेकडो घरांची वीज बंद केल्याच्या निषेधार्थ महावितरणच्या दारात वीज बिलांची केली होळी



कळंब (प्रतिनिधी)- दहावी बोर्ड परिक्षा सुरू असताना तसेच उन्हाळ्यात वीजेची मागणी जास्त असताना कळंब शहरात महावितरण कंपनीच्या स्मार्ट मीटर प्रणालीमुळे शेकडो ग्राहकांचा वीज पुरवठा बंद केला. थकीत बिलांमुळे वीज पुरवठा बंद केला असल्याचे कारण महावितरण कंपनीने पुढे केले. महावितरणचा निषेध म्हणून कळंब येथील सामाजिक कार्यकर्ते राहुल मुळे यांनी महावितरण कंपनीच्या कळंब कार्यालयाच्या दारात होळी दिवशीच वीज बिलांची होळी करून महावितरण कंपनीच्या कार्यपद्धतीचा निषेध नोंदवला.

कळंब महावितरण कडे दाखल केलेल्या तक्रार अर्जात तीन प्रश्न विचारले गेले १.कळंब शहरात घरगुती वीज वापर करणाऱ्या ग्राहकांची एकुण संख्या किती आहे, त्यापैकी किती ग्राहकांच्या घरी स्मार्ट मीटर बसवले गेले ? २.ज्या ग्राहकांच्या घरी स्मार्ट मीटर बसवले गेले त्यांची स्मार्ट मीटर बसवण्यासाठी पुर्वपरवानगी घेतली होती का ? ३.कळंब शहरातील स्मार्ट मीटर ग्राहकांचा वीज पुरवठा बंद करण्यापुर्वी महावितरण कंपनीच्या कळंब कार्यालयाने कळंब शहरातील घरगुती वीज वापर करणाऱ्या सर्व स्मार्ट मीटर ग्राहकांना थकबाकी न भरल्यास वीज पुरवठा वरिष्ठ पातळीवरून आपोआप बंद होणार आहे

याबाबत कळंब शहरात जनजागृती करुण माहिति दिली होती का ? याचा लेखी खुलासा महावितरण कंपनीने करावा अशी मागणी कळंब येथील सामाजिक कार्यकर्ते राहुल मुळे यांनी महावितरण कंपनीच्या कळंब कार्यालयाकडे केली आहे.

## धाराशिवमध्ये १०० विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरू : १० मार्चदरम्यान ऑनलाईन अर्ज मागविले

धाराशिव (जिमाका)- इतर मागास प्रवर्ग,विमुक्त जाती,भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील १२ वी नंतर उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह तसेच ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना अंतर्गत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

बी.ए.,बी.कॉम.,बी. एस्सी.अशा १२ वी नंतरच्या उच्च शिक्षण घेणाऱ्या व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश अर्ज १० मार्च २०२६ पर्यंत मागविले आहे.गुणवत्तेनुसार निवड यादी ११ मार्च २०२६ रोजी अंतिम करून प्रसिद्ध करण्यात येणार असून, निवड यादीनुसार प्रवेश घेण्याची अंतिम मुदत दि.१२ मार्च २०२६ ते दि.२० मार्च २०२६ अशी राहील.

जिल्ह्यात मुला -मुलींसाठी १०० विद्यार्थी क्षमतेचे वसतिगृह सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात आले आहे.वसतिगृह,ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना अंतर्गत प्रवेश अर्ज ऑनलाईन पद्धतीने करावयाचे असून,त्यासाठी https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर अर्ज सादर करावेत.

या योजनेंतर्गत प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या इतर मागास प्रवर्ग,विमुक्त जाती,भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील १२ वी नंतर उच्च शिक्षण घेत असलेल्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी वरील वेळापत्रकानुसार अर्ज करावेत, असे आवाहन सहाय्यक संचालक,इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, धाराशिव यांनी केले आहे.

## कळंबमध्ये ‘फुलचंद’ पानाचा विळखा; तरुणाई नशेच्या आहारी !



कळंब (प्रतिनिधी)- कळंब शहरातील तरुणांनी शरीर सुदृढ ठेवण्याऐवजी जीवघेण्या नशेचा मार्ग स्वीकारल्याचे धक्कादायक चित्र समोर येत आहे. शहरात ‘फुलचंद’ नावाने ओळखले जाणारे तंबाखूयुक्त पान सातवी-आठवीतील शाळकरी मुलांपासून ते महाविद्यालयीन युवकांपर्यंत वेगाने पसरत असून, संपूर्ण तरुण पिढीच या व्यसनाच्या विळख्यात अडकत चालली आहे.

मस्त वाटते, जोरदार नशा येते या भूलथापांना बळी पडून तरुणांमध्ये ‘कडक पान’ खाण्याची स्पर्धाच लागली आहे. मित्रांमध्ये टिंगल-टवाळी करण्यासाठी किंवा ‘मजा’ पाहण्यासाठी सक्तीने पान खायला लावण्याचे प्रकारही वाढले आहेत. सुरुवातीला गंमत म्हणून सुरू झालेले सेवन कधी कायमस्वरूपी व्यसन बनते, हे या कोवळ्या मुलांना कळतही नाही.

**मेंदूवर थेट परिणाम; कर्करोगाचा धोका वाढतो**

तज्ज्ञांच्या मते, अशा पानांमध्ये असलेली तीव्र रसायने व तंबाखू मेंदूवर थेट परिणाम करतात. निर्णयक्षमता कमी होणे, स्मरणशक्तीवर परिणाम, मानसिक अस्वस्थता, चिडचिडेपणा ही लक्षणे दिसू लागतात. सततच्या सेवनामुळे तोंडाचा व घशाचा कर्करोग होण्याचा धोका प्रचंड वाढतो. किशोरवयीन मुलांच्या पचनसंस्थेवर आणि वाढीवरही विपरीत परिणाम होत आहे. रोगप्रतिकारक शक्ती कमी होणे हे गंभीर लक्षण ठरत आहे.

**शाळा-महाविद्यालय परिसरातच जास्त खप**

दुर्दैवाची बाब म्हणजे, शाळा व महाविद्यालय परिसरात या पानाचा खप मोठ्या प्रमाणात होत असल्याची चर्चा आहे. आठवी ते दहावीतील विद्यार्थी आणि महाविद्यालयीन युवक मोठ्या प्रमाणावर या व्यसनाच्या आहारी जात आहेत. शैक्षणिक भवितव्य धोक्यात येत असताना पालक मात्र मुलांच्या बदलत्या वागणुकीकडे आणि खिशातील पैशांच्या वाढत्या खर्चाकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसते.

**समाज आणि प्रशासनाची जबाबदारी**

तरुणांचे वैयक्तिक आयुष्य, आरोग्य आणि करिअर धोक्यात येत असताना प्रशासनाने आणि समाजाने याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. अल्पवयीन मुलांना तंबाखूजन्य पदार्थांची विक्री रोखण्यासाठी कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. शाळा-महाविद्यालयांनी जनजागृती मोहीम राबवून विद्यार्थ्यांना या व्यसनापासून दूर ठेवण्याचा ठोस प्रयत्न करणे गरजेचे आहे.

कडक पान खाण्याच्या नादात मुले स्वतःचे आयुष्य अंधारात ढकलत आहेत. आज परिणाम जाणवत नसले, तरी उद्या हेच व्यसन जीवघेणे ठरू शकते, अशी भीती व्यक्त होत आहे.

‘ चौकट : पालकांनी आणि शिक्षकांनी वेळीच सावध व्हा! ‘

आपल्या मुलाच्या तोंडाचा वास, दातांचा रंग, अचानक बदललेले वागणे आणि मित्रांची संगत याकडे लक्ष द्या. मुलं शाळेत किंवा क्लासला गेल्यावर नेमके काय करतात, यावर देखरेख ठेवा.

‘फुलचंद’च्या विळख्यातून आपल्या लेकरांना वाचवण्यासाठी आजच पावले उचला - उद्या उशीर होऊ शकतो!

**उपचारापेक्षा प्रतिबंध महत्त्वाचा;** शाळेतूनच व्यसनमुक्तीचे संस्कार द्या! - डॉ. महादेव कोरसाळे

आज राज्यात आणि देशात वाढत चाललेल्या व्यसनाधीनतेच्या पार्श्वभूमीवर शाळा हीच पहिली आणि प्रभावी संस्कारशाळा ठरली पाहिजे. मुलांना केवळ पुस्तकातील ज्ञान देऊन चालणार नाही, तर व्यसनाचे भयंकर परिणाम काय असतात हे ठोस आणि वास्तव उदाहरणांसह शिकवले गेले पाहिजे, अशी आक्रमक भूमिका डॉ. महादेव कोरसाळे यांनी मांडली.

व्यसनामुळे शरीराची हानी होते, मानसिक संतुलन बिघडते, कुटुंब उद्ध्वस्त होते आणि आर्थिक कंबरडे मोडते. तरीही समाज डोळेझाक करत आहे. आज अनेक तरुण सिगारेट, गुटखा, दारू आणि इतर घातक व्यसनांच्या विळख्यात अडकताना दिसत आहेत. ही केवळ वैयक्तिक नाही, तर सामाजिक आपत्ती आहे, असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला.

ते पुढे म्हणाले, आजारी पडल्यानंतर लाखो रुपये खर्च करून उपचार करण्यापेक्षा, आजारच होऊ नये यासाठी शाळेपासूनच मूल्यशिक्षण देणे गरजेचे आहे. व्यसनमुक्ती हा फक्त आरोग्य विभागाचा विषय नसून शिक्षण विभाग, पालक आणि समाज यांचीही तितकीच जबाबदारी आहे.

जर आज आपण ठोस पावले उचलली नाहीत, तर उद्याची तरुण पिढी व्यसनांच्या आहारी जाईल आणि समाजाची पायाभरणीच कमकुवत होईल. त्यामुळे शासनाने शालेय अभ्यासक्रमात व्यसनमुक्ती, आरोग्य-जागरूकता आणि नैतिक मूल्यांचे शिक्षण सक्तीचे करावे, अशी ठाम मागणीही त्यांनी केली.

उपचारापेक्षा प्रतिबंध श्रेष्ठ हे तत्व अंगीकारूनच आपण निरोगी आणि सक्षम पिढी घडवू शकतो, असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

## नंदा जडे यांचे दु:खद निधन



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील ज्येष्ठ पत्रकार तथा लातूर समाचारचे संपादक दयानंद जडे यांच्या कनिष्ठ भगिनी सौ. नंदा शंकरराव जडे यांचे अल्पशा आजाराने उपचारादरम्यान निधन झाले.

त्या ५९ वर्षांच्या होत्या. दि. ४ मार्च रोजी सायंकाळी खाजगी रुग्णालयात त्यांची प्राणज्योत मावळली.

सौ. नंदा जडे या प्रशासकीय सेवेत कर्तव्यदक्ष व अभ्यासू अधिकारी म्हणून परिचित होत्या. महिला म्हणून प्रथमच तलाठी पदावर रुजू होत त्यांनी उल्लेखनीय कार्य केले.

त्यानंतर लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात मंडळ अधिकारी म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली. काही महिन्यांपूर्वीच त्या सेवानिवृत्त झाल्या होत्या. त्यांच्या सेवाकाळात त्यांनी प्रामाणिकपणा, शिस्त आणि लोकाभिमुख दृष्टीकोन यामुळे सहकाऱ्यांमध्ये वेगळी ओळख निर्माण केली होती.

त्यांच्या पश्चात पती राजेंद्र पंडित, तीन मुले, एक सुन व एक नातू असा परिवार आहे. त्या दयानंद जडे व विवेकानंद जडे यांच्या भगिनी म्हणूनही परिचित होत्या. त्यांच्या निधनामुळे जडे कुटुंबीयांवर तसेच परिचित वर्तुळात शोककळा पसरली आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## युद्धामुळे चिंतेचे वातावरण

युद्ध तसे कोणालाही परवडणारे नाही हे जरी सत्य असले तरी काहींना अविचाराने जोर निर्माण होतो. जगातील सर्वात मोठी महासत्ता असलेली अमेरिका आणि नेहमीच लष्करी संघर्षाच्या तयारीत असलेला इस्त्रायल यांनी एकमेकांच्या साथीने इराणवर केलेल्या युद्ध हल्ल्यामुळे आधीच होरपळलेल्या जगाला युद्धाचे चटके अधिकच तीव्रतेने जाणवणार आहेत. गेल्या काही वर्षांच्या कालावधीमध्ये रशिया आणि युक्रेन यांच्यातील संघर्षाने जगाला हादरवून सोडले होते. त्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील छोटा लष्करी संघर्षही समोर आला होता. इस्त्रायल आणि पॅलेस्टाइन यांच्यातील लष्करी संघर्ष दीर्घकाळ सुरू आहे. सध्या अफगाणिस्तान आणि पाकिस्तान यांच्यामध्ये सुद्धा युद्धसदृश परिस्थिती आहे. हे सर्व कमी होते म्हणून की काय आता इस्त्रायलने इराणवर घातक हल्ले करून जगाला आणखी एका मोठ्या युद्धाच्या उंबरठ्यावर आणून सोडले आहे. अर्थात, अमेरिकेच्या पुढाकाराने आणि सहकार्यानेच इस्त्रायलने हे हल्ले केले असल्याने या हल्ल्यामागे अमेरिकेचा मेंदू आहे हे उघड आहे. खरे तर एकीकडे इराण आणि अमेरिका यांच्यामध्ये जिनेव्हा येथे शांतता चर्चा सुरू असतानाच अशा प्रकारचे हल्ले करण्यात आले. या चर्चेतून काय निष्पन्न होत आहे याची वाट पाहण्याची तसदीही अमेरिका आणि इस्त्रायल यांनी घेतली नाही. अर्थात, या दोन्ही देशांना कोणत्या ना कोणत्या कारणाने इराणवर हल्ला करण्याची संधी हवीच होती. गेल्या वर्षीसुद्धा जून महिन्यामध्ये जे बारा दिवसांचे युद्ध झाले तेव्हासुद्धा या दोन देशांनी अशाच प्रकारे संधी मिळताच इराणला टार्गेट केले होते. इराणने आपला आण्विक कार्यक्रम थांबवावा आणि इराणी जनतेने आपले नेते बदलावेत या मागण्या अमेरिकेने कायम समोर ठेवल्या आहेत. पण इराणने कधीही अमेरिकेच्या या मागणीला महत्त्व दिलेले नाही. गेल्या काही वर्षांमध्ये उलट इराणने आपला आण्विक कार्यक्रम तीव्रतेने राबवला आहे. या कार्यक्रमासाठी लागणाऱ्या युरेनियम या इंधनाचा साठा इराणकडून मोठ्या प्रमाणात करण्यात येत आहे. जरी आम्ही अण्वस्त्र निर्मिती करत नाही असे इराणने जाहीर केले असले, तरी इस्त्रायल आणि अमेरिकेचा त्यावर विश्वास नाही. प्रादेशिक शांततेसाठी इराणने आपला आण्विक कार्यक्रम थांबवावा अशी मागणी सातत्याने या दोन देशांकडून करण्यात येत होती. इराणने या मागणीला महत्त्व न दिल्यानेच योग्य संधी साधून अमेरिका आणि इस्त्रायल यांनी इराणवर हल्ला केला. या युद्धात इराणचे सर्वोच्च नेते खामेनी यांचाही बळी गेला असल्याने इराणमध्ये सत्तांतर करण्यासाठी अमेरिकेने युद्धनीती वापरली आहे. अर्थात, ह्या युद्धाचे चटके फक्त या दोन देशांना बसत नाहीत तर इतरही अनेक देशांना होरपळ जाणवणार आहे. अमेरिका नेहमीच लांबवरून युद्ध लढते. अमेरिकेच्या भूमीवर अद्यापपर्यंत युद्ध झाले नसल्याने तेथील जनतेला युद्धाचे चटके जाणवत नाहीत. पण अमेरिकेचे मध्य पूर्व प्रदेशात हवाई आणि नाविक तळ आहेत त्यावर इराणने हल्ले केल्यामुळे दुबई, जॉर्डन, बहरिन यासारख्या देशांना विनाकारणच या हल्ल्यांचा त्रास होणार आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे इराणवर हल्ला करताना युद्धाचा मूलभूत नियमही इस्त्रायलने पाळला नाही. तेहरानमधील एका हल्ल्यामध्ये मुलींचे एक महाविद्यालय उद्ध्वस्त झाल्याने अनेक विद्यार्थिनी ठार झाल्या. युद्धामध्ये प्रत्यक्ष भाग घेणारे सैनिक आणि त्यांचे कमांडर यांची प्राणहानी ही समजण्यासारखी असली तरी सर्वसामान्य नागरिकांवर जेव्हा अशा प्रकारचे हल्ले केले जातात तेव्हा युद्धाचा अन्य हेतू आहे की काय अशी शंका आल्याशिवाय राहत नाही. अमेरिकेला फार पूर्वीपासूनच इराणमध्ये सत्तांतर हवे आहे त्यांना अशा प्रकारचा संघर्ष गरजेचाच होता. दुसरीकडे इस्त्रायलबरोबर नेहमी लष्करी संघर्ष करणारी हमास आणि हिजबुला या दहशतवादी संघटनांना इराणतर्फे सर्व प्रकारची आर्थिक आणि लष्करी मदत दिली जात असल्याचा दावा इस्त्रायलकडून केला जात असल्याने हा हल्ला करण्यामागे तेसुद्धा कारण आहे. अमेरिकेची सत्ता जेव्हापासून डोनाल्ड ट्रम्प यांच्या हातात आली आहे तेव्हापासून त्यांनी जागतिक व्यवस्था विस्कळीत करण्याची सुपारी घेतली आहे की काय अशी शंका येते. एकीकडे रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध संपवण्यासाठी प्रयत्न करणारे आणि भारत-पाकिस्तान यांच्यातील संघर्ष माझ्यामुळे संपला, असा दावा करणारे डोनाल्ड ट्रम्प इराणवर हल्ला करण्याची योजना राबवतात हा विरोधाभास न समजण्यासारखा आहे. जागतिक पातळीवर शांतता निर्माण करण्याचे प्रयत्न सातत्याने करत असल्याबद्दल आपल्याला नोबेल पुरस्कार दिला जावा अशी मागणी करणारे डोनाल्ड ट्रम्प यांनीच या नवीन युद्धाला सुरुवात केली आहे हा विरोधाभासही लक्षात घेण्यासारखा आहे. नेहमीसारखे युनोच्या सुरक्षा समितीने या संघर्षाला सुरुवात झाल्यानंतर तातडीने बैठक घेऊन या संघर्षाचा निषेध केला असला, तरी त्या पलीकडे सुरक्षा समिती काही करू शकेल असे वाटत नाही. गेल्यावर्षी जून महिन्यामध्ये बारा दिवस चाललेल्या युद्धानंतर संघर्षाला विराम मिळाला असला, तरी यावेळी अमेरिका-इस्त्रायल आणि इराण या तीनही संबंधित देशांचे इरादे लक्षात घेता या वेळेचा हा लष्करी संघर्ष लवकर संपेल अशा प्रकारचे कोणतेही संकेत मिळत नाहीत. खामेनी यांच्या मृत्यूनंतर इराण गप्प बसून अमेरिका आणि इस्त्रायलला शरण जाईल असेही वाटत नाही शिवाय जागतिक पातळीवरही तीव्र भावना निर्माण झाल्या आहेत. साहजिकच आणखी काही दिवस जगाला या युद्धाच्या चटक्यांनी होरपळावे लागणार आहे. या युद्धाचा परिणाम निश्चित होणार आहे. त्याच प्रमाणे कोणत्याही परिस्थितीत युद्ध विरामाची गरज आहे. जागतिक स्तरावर बरीच उलथापलथ होण्याची शक्यता आहे. तेलाकडे लक्ष आहे. काही झाले तरी जागतिजक स्तरावर या बाबत विचार होणे अपेक्षित आहे. एक दबाबगट जागतिक स्तरावर निर्माण करून अमेरिकेसह सर्वावर युद्ध थांबले पाहिजे. या बाबीचा विचार झाला पाहिजे. युद्ध कोणत्याही परिस्थिती थांबले पाहिजे. यासाठी जागतिकस्तरावर प्रयत्नाची मोठी गरज आहे. या युद्धाबाबत सर्वत्र चिंतेचे वातावरण दिसून येत आहे.

# जास्तीत जास्त शेतकऱ्यांना लाभ होईल अशा रस्त्यांना मुख्यमंत्री बळीराजा पांणद रस्ते योजनेत प्राधान्य द्यावे

## लातूर ग्रामीण विधानसभा क्षेत्र समितीच्या बैठकीत आ. रमेशआप्पा कराड यांची सूचना




**लातूर/प्रतिनिधी :** राज्य शासनाने नव्याने गठीत केलेल्या मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ता विधानसभा क्षेत्र समितीची बैठक समिती अध्यक्ष लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी झाली. मतदार संघात २५ किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे काम हाती घेतले जाणार असून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना लाभ होईल अशा रस्त्यांना बळीराजा पांदण रस्ते योजनेत प्राधान्य द्यावे अशी सूचना या बैठकीत आ. रमेशआप्पा कराड यांनी केली.

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि शेतीतील मशागतीची कामे वेळेत व्हावीत, शेतमालाची सुलभ वाहतूक सुनिश्चित करण्यासाठी बारमाही शेतरस्ते असणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना सुरू केली आहे.

शासन निर्णयानुसार विधानसभा क्षेत्र निहाय समिती गठीत करण्यात आलेली आहे. या लातूर ग्रामीण विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीची पहिली बैठक मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ता लातूर ग्रामीण विधानसभा क्षेत्र समिती अध्यक्ष आ. श्री. रमेशआप्पा काशिराम कराड यांचे अध्यक्षतेखाली दि.०४ मार्च २०२६ रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय लातूर येथे सकाळी ११ वाजता संपन्न झाली.

या बैठकीस मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ता लातूर ग्रामीण विधानसभा क्षेत्र समितीचे सचिव तथा लातूर उपविभागीय अधिकारी सौ. रोहिणी नऱ्हे, रेणापूर - औसा उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे, रेणापूरचे तहसीलदार प्रशांत थोरात, औसा तहसीलदार घनश्याम अडसूळ, गटविकास अधिकारी सुमित जाधव, लातूरचे श्याम गोडभरले, औसा गटविकास अधिकारी आनंद मिरकले, भूमि अभिलेख अभियंता अशोक चव्हाण, सा. बा. उपअभियंता गोबाडे, जिप बा. उप अभियंता एस जी कुलकर्णी, लेखा अधिकारी डी. एस. डांगे, कृषी अधिकारी एस. जी. कांबळे, दत्तात्र्य हाके यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

सदर बैठकीत आ. श्री. रमेशआप्पा कराड यांनी लातूर ग्रामीण विधानसभा क्षेत्रातील सर्व रस्त्यांची माहिती घेतली. पहिल्या टप्प्यात एकूण २५ किलोमीटर लांबीच्या रस्ते कामात रेणापूर तालुका दहा, लातूर तालुका दहा आणि औसा तालुका पाच किलोमीटरचे काम करण्यात यावे. लातूर ग्रामीण मतदार संघात यापुर्वी झालेल्या शेत आणि पाणंद रस्त्यांची माहिती अद्यापपर्यंत कोणत्याही योजनेमधुन रस्त्यांची कामे झालेली नाही अश्या सर्व रस्त्यांची माहिती संकलीत करण्यात यावी. ज्या ठिकाणी सदर शासन निर्णयानुसार रस्ता मजबुतीकरण करावयाचे आहे अशा रस्त्यांचे अतिक्रमण पोलिस विभाग व महसूल विभागाच्या समन्वयाने करावे. सदर रस्त्यांचे सिमांकन भुमी अभिलेख विभागाने तात्काळ करून देण्यात यावे अशा सुचना दिल्या.

येत्या काळात सुरू होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियाना अंतर्गत शासनाच्या विविध योजनेचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यापर्यंत पोहोचला पाहिजे यासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत. शेतकरी सन्मान योजना, लाडकी बहीण योजना, निराधारांच्या पगारी यासह विविध योजनेचा लाभ मिळत असताना अनेक लाभार्थी या योजनेपासून वंचित राहत आहेत. तेव्हा त्यांच्या त्रुटी दूर करण्याचे काम तातडीने करावे गायगोठे, विहिरी यासह विविध वैयक्तिक लाभाच्या योजनेबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी येत असल्याबाबत नाराजी व्यक्त करून कोणाचीही अडवणूक आणि पिळवणूक होणार नाही याची काळजी घ्यावी अशा कडक शब्दात आ. रमेशआप्पा कराड यांनी बैठकीत सूचना दिल्या.

प्रारंभी समिती सचिव तथा उपविभागीय अधिकारी सौ. रोहिणी नऱ्हे यांनी मुख्यमंत्री बळीराजा शेत /पांदन रस्ता योजने संदर्भात शासन निर्णयाची सविस्तर माहिती देऊन लातूर रेणापूर तालुक्यासह भादा सर्कल मध्ये एकूण ११४३ विविध शेत पांणद रस्ते असून त्यात गाव नकाशावर नोंद असलेले रस्ते ७६८ आणि नोंद नसलेले ३७५ रस्ते असल्याची माहिती दिली. ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांसह शेतकरी विद्यार्थी महिला यांच्या महसूल विभागाशी निगडित प्रलंबित प्रश्न तात्काळ निकाली काढण्यासाठी येत्या मार्च ते मे दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान राबविण्यात येणार असल्याची माहिती दिली. मा. तहसीलदार यांनी कोणती रस्ते खुले असून कोणते रस्ते अतिक्रमीत आहेत याबाबत माहिती दिली.

सदर योजनेअंतर्गत रस्त्यांच्या कामाचा शुभारंभ छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियानाअंतर्गत करण्यात यावा त्यादृष्टीने सर्वांनी तयारी करावी तसेच सदर रस्त्यांची निवड करताना रस्त्यांची स्थिती, आवश्यकता व गाव भेटी व शिवार भेटी आयोजित करून प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून निश्चिती करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी असे निर्देश आ. कराड यांनी दिले.

## दयानंद कला महाविद्यालयात चित्रपटासाठी ऑडिशन

**लातूर/प्रतिनिधी :** रसिका फिल्म प्रॉडक्शन निर्मित मराठी चित्रपट आणि दयानंद कला महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या संयुक्त विद्यमाने दि. ७ मार्च, २०२६ रोजी चित्रपटासाठी कलाकारांचे ऑडिशन घेण्यात येणार आहे.

'शोध कलाकारांचा वेध उज्ज्वल भविष्याचा' या घोषवाक्यानुसार रसिका फिल्म प्रॉडक्शन हे ऑडिशन दु. २ ते ६ या वेळेत घेणार आहे. ऑडिशन देणाऱ्या कलाकारांसाठी सहा ते पासष्ट वर्षे वयाची अट ठेवण्यात आली आहे. निवड झालेल्या कलाकारांना चित्रपटात नामांकित आणि दिग्गज कलाकारांसोबत काम करण्याची संधी प्राप्त होणार आहे. ऑडिशन देणारा कलावंत चित्रपट अथवा नाटकातील कोणताही संवाद अथवा दृश्य दोन मिनीट सादर करु शकतो. या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, रसिका फिल्म प्रोडक्शनचे संचालक प्रा. डॉ. प्रकाश जाधव, उपप्राचार्य प्रा. डॉ. अंजली जोशी आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक तसेच सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. संतोष पाटील संशोधन केंद्राचे संचालक प्रा. डॉ. अंकुशकुमार चव्हाण यांनी केले आहे. कलावंतांनी पुढील क्रमांकावर संपर्क साधावा. मों. नं. ८६५२६८८०१६ , ९४२२६१२८१०.

# मौखिक आरोग्याची जाणीव, निरोगी जीवनाची हमी

**डॉ. प्राजक्ता गायकवाड**
**सहाय्यक प्राध्यापक**
**बाल दंत चिकित्सा विभाग,**
**माईर एमआयडीएसआर दंत महाविद्यालय व रुग्णालय, लातूर**



दरवर्षी ६ मार्च रोजी राष्ट्रीय दंत चिकित्सक दिन साजरा केला जातो. दात आणि मौखिक आरोग्याबाबत जनजागृती करणे तसेच समाजाच्या आरोग्यसेवेत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या दंतचिकित्सकांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे, हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. निरोगी दात हे केवळ सुंदर हास्यासाठीच नव्हे तर संपूर्ण शारीरिक आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक आहेत. दात आणि हिरड्यांचे आरोग्य बिघडल्यास त्याचा परिणाम शरीरातील इतर अवयवांवर ही होऊ शकतो. त्यामुळे ''निरोगी दात म्हणजे निरोगी जीवन'' हा संदेश समाजापर्यंत पोहोचवणे अत्यंत गरजेचे आहे.

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत अनेकजण दातांची योग्य काळजी घेत नाहीत. वेदना झाल्यावरच दंत चिकित्सकांकडे जाण्याची सवय अनेकांमध्ये दिसून येते. परंतु तज्ज्ञांच्या मते, दर सहा महिन्यांनी नियमित दंत तपासणी केल्यास दातांतील किड, हिरड्यांचे आजार किंवा इतर समस्या सुरुवातीच्या टप्प्यातच ओळखता येतात आणि मोठे उपचार टाळता येतात. दिवसातून किमान दोन वेळा योग्य पद्धतीने दात घासणे, फ्लोराईडयुक्त टूथपेस्टचा वापर करणे, गोड पदार्थांचे सेवन कमी करणे आणि संतुलित आहार घेणे या साध्या सवयी दात निरोगी ठेवण्यासाठी उपयुक्त ठरतात.

विशेषतः लहान मुलांमध्ये दातांची स्वच्छता आणि योग्य सवयी बालपणापासूनच रुजवणे आवश्यक आहे. दुधाचे दात तात्पुरते असले तरी ते मुलांच्या बोलण्याच्या, खाण्याच्या आणि चेहऱ्याच्या योग्य वाढीसाठी महत्त्वाचे असतात. मुलांना दिवसातून दोन वेळा ब्रश करण्याची सवय लावणे, जेवल्यानंतर चुळ भरण्याची सवय लावणे आणि नियमित तपासणीसाठी दंत चिकित्सकांकडे नेणे ही पालकांची जबाबदारी आहे. योग्य वेळी मार्गदर्शन मिळाल्यास मुलांचे भविष्यातील दंत आरोग्य अधिक चांगले राहू शकते.

दंत चिकित्सक केवळ दातदुखीवर उपचार करणारे डॉक्टर नसून ते किड प्रतिबंध, हिरड्यांचे विकार, दातांची मांडणी - सुधारणा, दंत सौंदर्य चिकित्सा आणि मौखिक कर्करोग निदान अशा विविध क्षेत्रांत सेवा देतात. आधुनिक तंत्रज्ञानामुळे उपचार अधिक सुरक्षित, अचूक आणि कमी वेदनादायक झाले आहेत. तरीही भीती किंवा गैरसमजुतीमुळे अनेकजण दंत चिकित्सकांकडे जाणे टाळतात. ही प्रवृत्ती बदलणे आवश्यक आहे.

तंबाखूचे सेवन हा मौखिक आरोग्यासाठी गंभीर धोका आहे. सिगारेट, बिडी, गुटखा किंवा पानमसाला यांसारख्या पदार्थांमुळे तोंडाचा कर्करोग, हिरड्यांचे आजार, दात पिवळे पडणे आणि श्वसनाचे विकार उद्भवू शकतात. त्यामुळे तंबाखूविरोधी जनजागृती करणे ही काळाची गरज आहे. युवकांमध्ये वाढणारे तंबाखूचे प्रमाण लक्षात घेता शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक स्तरावर प्रबोधनपर उपक्रम राबवणे आवश्यक आहे.

ग्रामीण व दुर्गम भागात दंत सेवा पोहोचवणे हेही एक मोठे आव्हान आहे. मोफत दंत तपासणी शिबिरे, मोबाईल दंत चिकित्सा व्हॅन, टेलीडेंटिस्ट्री सेवा आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण या माध्यमातून दंत आरोग्य सेवा सर्वांपर्यंत पोहोचवता येऊ शकते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी सवलतीच्या दरात उपचार उपलब्ध करून देणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

दातांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी नियमित फॉलो-अप व्यवस्था आवश्यक आहे. उपचारानंतर डॉक्टरांनी दिलेल्या सूचनांचे पालन करणे, पुढील भेटीची नोंद ठेवणे आणि दैनंदिन मौखीक स्वच्छता पाळणे या गोष्टींकडे दुर्लक्ष करू नये. नियमित मौखीक आरोग्याची काळजी घेतल्यास दातांची किड, हिरड्यांचे आजार आणि मोठ्या शस्त्रक्रिया टाळता येतात.

राष्ट्रीय दंत चिकित्सक दिन हा केवळ एक औपचारिक दिवस नसून दंत आरोग्याबाबत जागरूक राहण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. आपल्या दैनंदिन जीवनात मौखीक स्वच्छतेच्या सवयी अंगीकारून आणि नियमित दंत तपासणी करून आपण निरोगी हास्य कायम राखु शकतो. चला, या दिनानिमित्त आपण सर्वांनी दातांची योग्य काळजी घेण्याचा आणि दंत चिकित्सकांच्या मार्गदर्शनाचे पालन करण्याचा निर्धार करूया. कारण स्वस्थ दात म्हणजेच निरोगी आरोग्य होय.

**शब्दांकन: श्रीधर घुले**
**जनसंपर्क अधिकारी,**
**माईर एमआयटी, लातूर**

## बौद्ध धम्म हा समतेचा मार्ग - भिक्खू पय्यानंद थेरो; फाल्गुण पौर्णिमा धम्मदेशना व सत्कार समारंभ उत्साहात संपन्न



**लातूर/प्रतिनिधी :** तथागत बुद्धाने संपूर्ण जगाला करुणा, बंधुभाव, अणि शांतीची शिकवण दिली. केवळ करुणा, बंधुता आणि शांती सदाचाराने विश्वात सामाजिक समानता प्रस्थापित होवू शकते म्हणून तथागत बुद्धाने मानवी समाजात सामाजिक दरी नष्ट करण्यासाठी समता तत्वे प्रतिपादित केले आहे. यामुळे बौद्ध धम्म हा समतेचा मार्ग असल्याचे प्रतिपादन पु. भिक्खू पय्यानंद थेरो यांनी केले आहे.

बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने फाल्गुण पौर्णिमा धम्मदेशना तथा सत्कार समारंभ प्रसंगी भंतेजी बोलत होते.

कार्यक्रमाची सुरुवात तथागत गौतम बुद्ध तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस प्रमुख पाहुणे व भिक्खू संघ यांच्या हस्ते वंदन करून करण्यात आली. त्यानंतर भंते बोधिराज यांनी उपस्थितांना त्रिसरण पंचशील दिले.

या प्रसंगी दिपाली आदमाने, (नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्या, लातूर ), अमोल देडे (पंचायत सदस्य, लातूर), प्रा. डॉ. प्रदीप सुर्यवंशी (दयानंद महाविद्यालय, लातूर), भारत आदमाने (माजी संचालक, विकास सहकारी साखर कारखाना), पाडुरंग देशमुख (सरपंच, गोंदेगाव), जयराम येडगे, अरुण गायकवाड (पाटबंधारे अभियंता, लातूर), नागेश कांबळे (युवा उद्योजक, लातूर), गोविंद कांबळे (अध्यक्ष, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती २०२६), ज्योती मोठे (सहशिक्षक, नंदादीप माध्यमिक विद्यालय, लातूर), चंद्रशेखर मोठे (सहशिक्षक, तुळजाभवानी प्राथमिक विद्यालय, लातूर) तसेच चि. अथर्व मोठे (यु-ट्यूब स्टार) यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

पुढे बोलताना भिक्खू पय्यानंद थेरो म्हणाले की, बौद्ध धम्म हा केवळ पूजा-अर्चेपुरता मर्यादित नसून तो आचरणाचा धम्म आहे. पंचशील, अष्टांगिक मार्ग आणि प्रज्ञा-शील-समाधी यांच्या माध्यमातून व्यक्तीचा चारित्र्य विकास घडतो आणि त्यातूनच समाज परिवर्तनाची प्रक्रिया सुरू होते. अन्याय, अंधश्रद्धा आणि भेदभाव यांचा त्याग करून भगवान बुद्धांचा वैज्ञानिक दृष्टिकोन आणि बंधुता स्वीकारली तरच खऱ्या अर्थाने समताधिष्ठित समाजाची उभारणी होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. दुश्यंत कटारे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. अरुण कांबळे यांनी तर आभार मिलिंद धावारे यांनी मानले.धम्म पालन गाथेनंतर कार्यक्रमाची सांगता आशीर्वाद गाथेने झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उदय सोनवणे, अनिरुद्ध बनसोडे, धम्मपाल साकळे, विलास अवशंक, आकाश सरवदे, करण ओव्हाळ, राजेश कदम, ज्योतीराम लामतुरे, पंडित सूर्यवंशी, गौतम आदमाने ई.सह महाविहार धम्मसेवक ग्रुपच्या सर्व सदस्यांनी प्रयत्न केले.

या प्रसंगी विविध नगरातील महिला मंडळ, प्राध्यापक, डॉक्टर, वकील, समाजातील प्रतिष्ठित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती २०२६चे सर्व सदस्य सह मोठ्या संख्येने बौद्ध उपासक उपासिकांची उपस्थिती होती. धम्म, समता आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देत कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## संशोधनासाठी अर्थसहाय्य करणाऱ्या भारतात अनेक संस्था- गरज आहे गुणवत्तापूर्ण संशोधनाची; महाराष्ट्र महाविद्यालयातील विद्यापीठ स्तरीय कार्यशाळेत मान्यवरांची प्रतिपादन




**निलंगा/प्रतिनिधी :** दर्जेदार, उत्तम व गुणवत्तापूर्ण संशोधन व्हावे यासाठी शासनाकडून व विविध संस्थांकडून भरपूर अर्थसहाय्य प्राप्त होते. संशोधक, महाविद्यालय, विद्यापीठ (देशी,परदेशी) यांच्यामध्ये सामंजस्य करार होऊन संशोधन उत्तम व दर्जेदार होऊ शकते. अशा संशोधनाची माहिती इतरांपर्यंत पोहोचावी म्हणून चर्चासत्राचे आयोजन करण्यासाठी व या संशोधनाच्या प्रकाशनासाठी सुद्धा विविध प्रकारच्या संस्था अर्थसहाय्य देण्यासाठी तयार आहेत. फक्त त्यासाठी गुणवत्तापूर्ण संशोधनाची गरज आहे. असा विचार निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयात आयोजित ''संशोधन कार्यपद्धती व त्यासाठी मिळणारे अर्थसहाय्य'' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेतील मार्गदर्शकांकडून व्यक्त करण्यात आला. या कार्यशाळेसाठी महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री. विजय शिवाजीराव पाटील निलंगेकर यांनी शुभेच्छा दिल्या व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील डॉ. सिंकू कुमार सिंग, राजश्री शाहू महाविद्यालयातील डॉ. प्रकाश रोडीया यांनी या कार्यशाळेला मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम हे होते. आपल्या अध्यक्षीय समारोपात त्यांनी सध्याच्या परिस्थितीत दर्जेदार संशोधन आणि त्यासाठीची उत्कृष्ट संशोधन कार्यपद्धती व त्याला जोडून मिळणारे अर्थसहाय्य हा सध्याच्या उच्च शिक्षणाचा कणा आहे असे मत व्यक्त केले. उद्घाटन प्रसंगी विचार मंचावर उपप्राचार्य डॉ. भास्कर गायकवाड, कार्यशाळेचे संयोजक डॉ. अजित मुळजकर, डॉ. गोपाळ मोघे, प्रा. रवींद्र मदरसे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. ज्ञानेश्वर चौधरी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शिल्पा कांबळे व प्रा. दुर्गेश्वरी चोथवे यांनी केले तर पाहुण्यांची ओळख व आभार डॉ. गोपाळ मोघे यांनी मानले.

या कार्यशाळेसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या कार्यक्षेत्रातील विविध महाविद्यालयातील प्राध्यापक, संशोधक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# भंडारदरा



इहरपवरीवरीरभंडारदरा हे नाशिकपासून ७० कि.मी. वर असणारे निसर्गरम्य ठिकाण आहे. भंडारद-याचे खरे सौंदर्य हे पावसाळयानंतर अधिक खुलते, नाहीतर इतर वेळेला हा भाग अगदी रखरखीत असतो. १९२६ साली बांधलेले भंडारदरा धरण हे आशिया खंडातील सर्वात जुने धरण आहे. इथला 'छत्री' (ीं-लीशश्रश्रर) धबधबा हा अतिशय सुंदर व मनोहर आहे. भंडारद-यापासून ११ कि.मी. वर रंधा धबधबा आहे. हा धबधबा ४५ मीटर उंचीवरून खाली कोसळतो. त्यामुळे हे दृश्य सुंदर असून सुध्दा भीतीदायक वाटते. हा धबधबा पाहण्याकरिता पर्यटकांसाठी सुरक्षित सोय केली आहे. गिर्यारोहणाची आवड असणाऱ्यांना भंडारद-यापासून कळसूबाई शिखर खूपच जवळ आहे. महाराष्ट्रातले उंच असणारे हे शिखर समुद्रसपाटी पासून १,६४६ मीटर उंच आहे. हा भाग दाट जंगल-झाडींनी वेढलेला आहे. विविध प्रकारचे वन्य प्राणी व पक्षी येथे सहजपणे आढळतात.

रस्ता घनदाट जंगलातून जात असल्यामुळे गिर्यारोहकांनी स्थानिक वाटाडयांची अथवा पुस्तकांची मदत घेतलेली अधिक चांगली. जवळ अमृतेश्वर देऊळ आहे. येथे शंकराची पुरातन पिंड आहे. अमृतेश्वरला बोटीने जावे लागते. येथूनच पुढे रतनगड किल्ला आहे. हा किल्ला फारसा वैशिष्टयपूर्ण नसला तरी पर्यटकांसाठी भेट देण्याजोगा आहे.

भंडारद्यापासून २२ कि.मी. असणारे 'घाटघर' ठिकाण थरारक ड्रायव्हींगची आवड असणा-यासाठी योग्य आहे. पावसाळयात ह्या भागात संपूर्णत: धुके असते. तसेच घाटघर कडे जाणारा रस्ता खाचखळग्यातून जाणारा निमूळता रस्ता आहे. त्यामुळे चालक रस्ता चुकण्याची शक्यता अधिक आहे. भंडारदरा येथे महाराष्ट्र पर्यटक मंडळाने राहण्याची व जेवण्याची उत्कृष्ट सोय केली आहे. मंडळाची रहाण्याची सोय तळयाकाठी असल्यामुळे पर्यटकांना आकर्षित करते. राहण्याची सोय दूरध्वनी (६२८१६९, ६२६८६७) वरून होऊ शकते. आता काही खाजगी हॉटेल्सची सोय सुध्दा उपलब्ध आहे. भंडारदारा येथे तुम्हाला उच्चप्रतीची राहण्याखाण्याची सोय कदाचित मिळणार नाही पण निसर्गाचा आनंद मात्र मनमुराद लुटता येईल.

इहरपवरीवरीर वराप्रेक्षणीय स्थळे

भंडारदरा धरण-

मुंबई-भंडारदरा अंतर १८१ कि.मी. भंडारदरा धरण म्हणजेच आर्थर लेक विल्सन डॅम, अशिया खंडातील एकमेव सर्वात जूने धरण सन १९२६ साली इंग्रजांनी बांधलेले असून ते समुद्रसपाटीपासून ७५० मिटर उंचीवर आहे. धरणाची क्षमता ११ टी. एम. सी. , धरणाचे परिक्षेत्र-१२१.७० चौरस किलो मिटर पाऊस, ३००० मिली मिटर असतो.

अंब्रेला फॉल - (छत्री धबधबा)

इहरपवरीवरीरभंडारदरा धरणाच्या भिंती लगत असून खूपच रमणीय व सुंदर दृश्य असते.रांधा फॉल - भंडारदरा धरणापासून अवघ्या ११ किलो मिटर अंतरावर आहे. तेथे ४५ मिटर वरून खाली पाणी पडते.

अमृतेश्वराचे मंदीर व रतनगड

भंडारद-यापासून बोटीने ८ किलो मिटर लांब. अमृतेश्वर मंदीर हे हेमाडपंथी शंकराचे शिल्प कलाकृती मंदीर असून १२०० वर्ष पूर्वीचे जुने मंदीर आहे.

घाटघर-भंडारद-यापासून अंतर २० कि. मी. तेथे कोकण कडा आहे.

पेमगिरी-भंडारद-यापासून ५५ कि.मी. अंतरावर असून तेथे वडाचे झाड दिड एकर परिक्षेत्रात पसरलेले आहे.

कळसूबाई शिखर

घरश्रींलरळमहाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर सह्याद्री पर्वतावर असून उंची १६६४ मीटर आहे. डेलरींळेप खलेप

भंडारद-यास आपण कसे याल ?

हवाई - जवळचे विमानतळ मुंबई.

रेल्वेमार्ग - जवळचे रेल्वस्थानक इगतपूरी, सेंटर रेल्वपासून ४५ किलामिटर.

बसमार्ग - मुंबई - भंडारदरा १८५ कि.मी. , पुणे - भंडारदरा १९१ कि.मी.

आरक्षणासंबंधी माहिती

वरिष्ठ व्यवस्थापक (वाणिज्य)महाराष्ट्रात पर्यटन विकास महामंडळ सी. डी. ओ, हटमेन्टस् , मादमकामा रोड,
योगक्षेम बाजूला,मुंबई - ४०००२०
फोन- २०२६७१३, २०२४६२७,
फॅक्स - ९१२२-२८५२१८२२.

घरश्रींलरळवरिष्ठ व्यवस्थापक म. प. वि. म.प्रादेशिक कार्यालय -
टी / १ गोल्फ क्लब,
जूना आग्रा रोड नाशिक - २
टेलिफॅक्स - (०२५३) ५७००५९३.

# पायांचे आरोग्य उत्तम राखण्यासाठी



नियमित चालणे, व्यायाम, आणि पौष्टिक आ-हार घेणे आवश्यक आहे. स्नायूंना आराम देण्यासाठी गरम पाण्यात मीठ टाकून पाय शेकणे २ आणि लोहाची कमतरता भरून काढण्यासाठी हिरव्या पालेभाज्यांचे सेवन करणे फायदेशीर ठरते ३. वजन नियंत्रित ठेवणे हा देखील पाय निरोगी ठेवण्याचा एक महत्त्वाचा उपाय आहे ७.

पायांच्या आरोग्यासाठी महत्त्वाच्या टिप्स (डशस क्शरश्रींह ढळींि):

नियमित व्यायाम: चालणे, धावणे, नृत्य किंवा योगासने केल्याने पायांचे स्नायू मजबूत होतात आणि सांधेदुखी कमी होते १, ७, ९. उबदार पाण्याने शेकणे: थकलेले पाय आणि स्नायूंच्या वेदना कमी करण्यासाठी गरम पाण्यात मीठ टाकून पाय १०-१५ मिनिटे भिजवून ठेवा २. संतुलित आहार: आहारात लोह (खीप), कॅल्शियम आणि जीवनसत्त्वे (तळींराळपी) समृद्ध पदार्थांचा समावेश करा. हिरव्या पालेभाज्या, फळे आणि कडधान्ये खा ३,वजन नियंत्रण: शरीराचे वजन नियंत्रित राहिल्यास पायांवरचा अतिरिक्त ताण कमी होतो, ज्यामुळे सांधेदुखी (गेळपीं रिळप) टाळता येते पाण्याची कमतरता टाळा: भरपूर पाणी प्या, यामुळे स्नायू पेटके (डशस लीरिीं) आणि वेदना कमी होण्यास मदत होते. दीर्घकाळ उभे राहणे टाळा: एकाच जागी बराच वेळ उभे राहणे किंवा बसणे टाळा. दर ३०-४० मिनिटांनी थोडे चाला किंवा पायांची हालचाल करा २. पोषण: आहारात प्रक्रिया केलेले पदार्थ आणि जास्त साखर, मीठ टाळा ५. **टीप: जर पायांची दुखणी खूप काळापासून सुरू असेल, तर डॉक्टरांचा सल्ला अवश्य**

# अमेरिकेचा विनाशकारी इराणवर हल्ला

ट्रम्प यांचा कार्यकाळ जगाला तिसर्या महायुद्धाच्या दिशेने नेणारा ठरेल. अफगाणिस्तानवर पाकिस्तानने हल्ला केल्यावर ट्रम्प यांनी पाकिस्तानवर स्तुतीसुमने उधळली; पण अफगाणिस्तानात झालेली अमेरिकेची नाचक्की यातून धुऊन निघणार नाही.

अमेरिका आणि इस्रायलच्या हल्लयामुळे इराण बेचिराख होण्याच्या दिशेने चालला आहे. अमेरिकेचे लष्करी तळ असलेल्या सौदी अरेबिया, इराकसह पश्चिम आशियातील अनेक देशांवर इराणने हल्ला चढविला. होर्मुझची सामुद्रधुनी बंद झाल्याने जगासमोर खनिज तेलाचे संकट उभे राहिले आहे. गेल्यावर्षी जूनमध्ये इस्रायलने इराणवर हल्ला केला होता. त्यावेळी इस्रायलने अधिक आक्रमकता दाखवित अमेरिकेला युद्धात खेचून घेतले. यावेळी 'शांतीप्रिय' ट्रम्प यांच्यासाठीच युद्ध ही गरज ठरली होती. आयात शुल्काच्या नावाखाली जगभरातील देशांवर दांडगाई करणार्या ट्रम्प यांना अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने दणका दिला. यामुळे प्रतिमासंवर्धन त्यांच्यासाठी आवश्यक होतेच. ज्या रीतीने इराणच्या अणु कार्यक्रमाचा बहाणा करत अमेरिका आणि इस्रायलने इराणवर हल्ला केला, त्यातून कथित संयुक्त राष्ट्र आणि जागतिक व्यवस्थेचीच मृत्युघंटा वाजली आहे. इराणचे सर्वेसर्वा आयतुल्ला खामेनींसह अनेक बडे नेते आणि लष्करी अधिकारी अमेरिकेने ठार केले. अमेरिकेत ज्यु धर्मीयांचा गट प्रभावी आहे. यातूनच इस्रायलला पाठबळ, हे अमेरिकेचे धोरण राहिले आहे. यात विसंगती अशी की, इराणचा आण्विक कार्यक्रम इस्रायलसाठी धोकादायक असतो; पण लष्करामध्ये जिहादी मानसिकता रुजवत आणि धार्मिक विद्वेषाचे टोक गाठत पुढे चाललेल्या असीम मुनीर यांच्यासाठी मात्र अमेरिकेचा वेगळा न्याय असतो! पॅलेस्टाईनमध्ये इस्रायलकडून मानवी हक्काची कायम होणारी गळ-चेपी ना कधी ट्रम्प यांना खटकली, ना त्यांच्या आधीच्या अध्यक्षांनी त्याचा उच्चार केला. इस्रायलचा बागुलबुवा दाखवत आखाती देशांना आपल्या कह्यात ठेवण्याचे अमेरिकेचे धोरण बहुतांशी यशस्वी झाले आहे. या देशांनीही आपल्याला कणा आहे, असे कधी दाखविले नाही. कतार, बहारिन, जॉर्डन, कुवेत या देशांमध्ये अमेरिकेचे लष्करी तळ आहेत. इराणने त्या देशांमध्ये कोणत्या धर्माची संख्या अधिक आहे हे न पाहता त्यावर हल्ले केले. यापैकी बहुतेक देश औपचारिकदृष्ट्या सार्वभौम म्हणता येतील.



जागतिक शांतता धोक्यात

प्रत्यक्षात अमेरिकेच्या इशार्यावर कृती, हाच त्यांचा परिपाठ. या देशांवर हल्ला केल्यास त्यांच्याकडून युद्ध रोखण्यासाठी अमेरिकेवर दबाव येईल, असा इराणचा कयास असावा. ते साध्य झाले नाहीच, उलट शियाविरुद्ध सुन्नी, अशा दोन गटांत इस्लामी जग विभागले जाईल अशी चिन्हे आहेत. दुबईसारखे ठिकाण हे पर्यटन आणि गुंतवणूक यासाठी जागतिक पातळीवर नावारूपाला आले. त्या लौकिकाला पूर्ण तडा गेला असून हे नुकसान लवकर भरून येणारे नाही. शिवाय आखातातील देशांकडे पाहण्याचा जागतिक दृष्टिकोन देखील बदलणार आहे. देशांना आ-पले निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य आहे की नाही? असा प्रश्न अलीकडच्या काळात अमेरिकेच्या भूमिकेमुळे ऐरणीवर आला आहे. व्हेनेझुएलाच्या अध्यक्षांना ट्रम्प यांच्या सैन्याने पळवून नेत डांबले. आम्ही म्हणू तेच सत्य, हे धोरण बलाढ्य अमेरिका आणि तिचे माथेफिरु अध्यक्ष जोपर्यंत सोडत नाहीत तोपर्यंत जागतिक पातळीवर शांततेची ग्वाही मिळणे निव्वळ अशक्य आहे.

आयतुल्ला खामेनी यांची राजवट न्यायाची नव्हती. या राजवटीविरोधात मोठ्या प्रमाणात असंतोष होता. अलीकडच्याच काळात तेथील नागरिक हजारोंच्या संख्येने रस्त्यावर आले आणि त्यांनी आपला रोष व्यक्त केला. खामेनी आणि त्यांच्या यंत्रणेने शेकडोंची कत्तल केली. अमेरिका आणि इस्रायलच्या हल्लयाच्या वेळी इराणचे बहुसंख्य नागरिक इराणी सत्तेसोबत नव्हते. ही खामेनी यांच्यासाठी मोठीच उणीव ठरली. धर्माच्या नावाने नागरिकांच्या स्वातंत्र्याची गळचेपी वर्षानुवर्षे होत राहिल्यास बाहेरील सत्ता त्याचा फायदा उठवू शकतात, हे इराणसह अनेक देशांनी लक्षात घेतले पाहिजे. सौदी अरेबियात राजधानी रियाधमध्ये दूतावासावर झालेला हल्ला अमेरिकेला झोंबणारा ठरला आहे. पाकिस्तानात देखील अमेरिकेच्या विरोधात प्रचंड क्षोभ उसळला आहे. अमेरिका - इस्रायलच्या सामर्थ्यासमोर इराण टिकणार नाही, हे उघड आहे; पण बदला घेण्याची धमकी इराणने दिली आहे. अमेरिकेच्या अध्यक्षांना आज विजय मिळेल, पण अमेरिकी नागरिकांसमोर त्यांनी पुढच्या काळात संकट वाढून ठेवले आहे, हे खरे.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा




दररोज केळं खाउन त्यावर दूध पिण्याने समस्या दूर होईल.कांदा खाणे नेहमीच फायदेशीर ठरेल. कच्चा कांदा खाणे अधिकच चांगले परिणाम देईल.फास्ट फूड, अधिक प्रमाणात डेअरी प्रॉडक्ट्स, हेवी फूड्स सेवन केल्याने वाईट परिणाम दिसून येतात. असे खाद्य पदार्थ सेवन करणे टाळावे.पुनर्नवा अर्थात घेटुळी या वनस्पतीच्या मुळाचे दोन चमचे ताजे रस दुधासोबत दोन ते तीन महिन्यापर्यंत सेवन केल्याने वृद्ध व्यक्तीला देखील तारुण्य जाणवू लागतं.तिळाचे तेल आणि दुधी भोपळ्याचा रस सम प्रमाणात घ्यावा. रात्री झोपण्यापूर्वी या मिश्रणाने डोकं आणि शरीराची मालीश करावी.

## २ Joke — विनोद




माझ्या घरात मी बॉस आहे असे म्हणणारा पुरुष दुसऱ्या बाबतीतही खोटे बोलू शकेल हे लक्षात ठेवा.

## ३ Message — संदेश




Air hostess to Lalu Yadav:
Sir, R U Vage or Nonvage??
Lalu : Ka matlab:
Air hostess :
Sir Mera matlab hai,
Aap Shakahari hen Ya Masa-hari??
Lalu : Hutt sasuri..
I am Bihari..

## ४ Thought — सुविचार



सर्वात जास्त आनंद कोणत्या गोष्टीत असेल तर दुसऱ्यांना आनंद देण्यात.

**- कवि वर्डस्वर्थ**


**सुभाषित**

**अभ्यावहति कल्याणं विविधं वाक्**
**सैव दुर्भाषिता राजन्ननर्थायोपद्यते ।।**

(उद्योगपर्व, अध्याय ३४, श्लोक ७७ महाभारत)

अर्थ - वाणीने चांगले भाषण केले असता त्यापासून अनेक प्रकारे कल्याण होते परंतु दुर्भाषण केले असता तीच वाणी अनर्थाला कारण होते.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



## आडवे शब्द

१. गुन्हा
५. करमणूक करणारे
८. सडपातळ
११. खर्चापेक्षा ही अधिक असलेली बरी!
१२. गुजराथी नृत्य प्रकार
१४. वर्तुळ
१६. भरभराट
१९. मुरली, बासरी
२०. धोबी
२१. सैन्यातील एक हुद्दा
२३. घागरा
२४. बर्फाचा पर्वत
२५. अभय देणे
२७. श्रीमंत
२८. वहिवाट, शेत
२९. संपणे
३०. चुकीचे
३१. करार, भिस्त
३३. चांदणे प्रिय असणारा पक्षी
३५. स्वच्छ
३७. घर
३९. विपत्तीची कहाणी
४१. कणसातील दाणे
४३. सज्जनगडचे संत
४४. सार, अर्थ
४५. कुत्र्याच्या गळ्यातील वादी
४६. वर-वधू
४८. सरहद्द
४९. मुलांच्या भाषेत भांडणानंतरचा अबोला
५३. युद्ध
५५. लहान
५६. वेल
५८. जादू, भ्रम
५९. बाळाची बोलगाणी
६३. अतिशय हाल
६५. पावसाची झड
६६. राज्यघटना (हिंदी)
६७. गेरु
६८. पडते घेणे
७०. माया, प्रेम
७१. विविध
७३. संध्याकाळ
७४. हनुमान
७५. झकास, सुंदर
७६. राजकारणी यात्रा!
७७. रड्या माणूस
७८. मौल्यवान साठा

## उभे शब्द

१. ज्या जागेवरुन कोणीही हलवू शकत
२. राजाचा कालावधी
३. मोठ्ठीच गंमत,४. ऐट, दिमाख
५. वर्ण,
६. सोन्याचा धागा
७. '--- में हड्डी'
८. रस्ता, पर्थ
९. जिवलग मित्र
१०. समशेर
१३. लोकांचा समूह
१५. नवरा
१७. रत्न
१८. सूर्य, तापविणारा
१९. स्वयंपाकाचे शास्त्र
२२. सामान
२४. थंडीचे दिवस
२५. प्राण
२६. आशीर्वाद
२७. सावकार, श्रीमंत
२८. उत्तराधिकारी
२९. शाब्दिक हजामत
३२. दरवाजा
३३. हालचाल
३४. खरकट्याची रास
३६. पळून गेलेला
३८. हिंदीत दहा
४०. ओटा
४२. कर्ण
४४. तमाशा कलाकार
४७. उगाच भटकणे
४९. हस्त
५०. सर्वस्व
५१. भोळा (शंकर)
५२. लोखंडी वस्तूवरील गंज
५४. अभिप्राय
५७. चंद्र
५८. ममता, प्रेम
६०. डोंगर उतरण, ढाळ
६१. डासाचे चावणे
६२. गीत
६४. मिठी
६६. अनुमती, मान्यता
६८. टक, दृष्टी
६९. सहाय्य
७०. वारा
७१. बाई, स्त्री
७२. श्वान
७४. मुलांच्या भाषेत मांजर
७५. सिंहाचे पिल्लू

## आडवे उत्तर

१.अपराध ५.रंजक ८.सडसडीत ११.जमा १२.रासगरबा १४.वलय १६.बरकत १९.पावा २०.परीट २१.जमादार २३.परकर २४.हिमालय २५.जीवनदान २७.धनवान २८.वावर २९.खलास ३०.गैर ३१.दारामदार ३३.चकोर ३५.साफ ३७.सदन ३९.रडकथा ४१.मका ४३.रामदास ४४.तथ्य ४५.पट्टा ४६.नवरानवरी ४८.सीमा ४९.कट्टी ५३.समर ५५.सान ५६.लता ५८.माव ५९.बडबडगीत ६३.नरकयातना ६५.सर ६६.संविधान ६७.काव ६८.नरमणे ७०.ममता ७१.नाना ७३.सांज ७४.मारुती ७५.छान ७६.रथयात्रा ७७.रडतराऊत ७८.ठेवा

## उभे उत्तर

१.अढळपद २.राजवट ३.धमाल ४.तोरा ५.रंग ६.जर ७.कबाब ८.सडक ९.सखा १०.तलवार १३.समुदाय १५.यजमान १७.रतन १८.तपन १९.पाककला २२.माल २४.हिवाळा २५.जीव २६.वरदान २७.धनको २८.वारसदार २९.खरडट्टी ३२.दार ३३.चलनवलन ३४.रमराट ३६.फरारी ३८.दस ४०.कट्टा ४२.कान ४४.तमासगीर ४७.वतवतणे ४९.कर ५०.तनमनधन ५१.सांब ५२.तांब ५४.मत ५७.तारकनाथ ५८.माया ६०.डगर ६१.डसणे ६२.कविता ६४.कव ६६.संमती ६८.नजर ६९.मदत ७०.मरुत ७१.नार ७२.कुत्रा ७४.माऊ ७५.छावा




## थोडक्यात/ संक्षिप्त



### कॅप्टन कूल धोनीचा ताबा सुटला, पोलिसांच्या सापळ्यात अडकला, रांचीच्या रस्त्यावर थरार!

रांची–टीम इंडियाचा माजी कर्णधार एमएस धोनी पुन्हा एकदा चर्चेत आला आहे, पण यावेळी धोनीचे चर्चेत यायचे कारण त्याची मैदानावरची कामगिरी नाही, तर वाहतूक नियमांचे उल्लंघन आहे. रांचीमधील वाहतूक पोलिसांनी एमएस धोनीला ओव्हरस्पीडमध्ये कार चालवल्यामुळे दंड ठोठावला आहे. रांची शहरातील कांके परिसरात ही घटना घडली आहे. वाहतूक देखरेख करणाऱ्या कॅमेऱ्यांनी धोनीच्या आलिशान कारने वेगमर्यादा ओलांडल्याचे रेकॉर्ड केले. त्यानंतर, मोटार वाहन कायद्यांतर्गत चलन जारी करण्यात आले.

**धोनीला कितीचा दंड?**

वेगमर्यादा ओलांडल्याबद्दल धोनीला एक हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. ई–चलन प्रणाली अंतर्गत ही कारवाई करण्यात आली. ज्या वाहनासाठी चलन जारी करण्यात आले आहे ती काळी मर्सिडीज कार आहे. या संदर्भात धोनी किंवा त्याच्या प्रतिनिधींनी अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही.सर्व नागरिकांना वाहतुकीचा समान नियम लागू आहे, अशी प्रतिक्रिया वाहतूक विभागाकडून देण्यात आली आहे. धोनी त्याच्या मूळ गावी रांचीमध्ये अनेकदा आलिशान कार आणि बाईक चालवताना दिसतो. धोनीच्या गॅरेजमध्ये अनेक आलिशान वाहने आहेत. यामध्ये जीप, ग्रँड चेरोकी, ट्रॅकहॉक, मर्सिडीज–बेंझ जी ६३ एएमजी आणि निसान जोंगा यासारख्या गाड्या आणि अनेक सुपरबाईक्सचा समावेश आहे.गेल्या आठवड्यात, झारखंड राज्य गृहनिर्माण मंडळाने रांची येथील निवासी भूखंडाच्या कथित व्यावसायिक वापराबद्दल धोनीला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

### विश्वचषकाचा अंतिम सामना अहमदाबादमध्ये नव्हे तर मुंबईत करा',

**मुंबई**–सध्या क्रिकेटमधील सर्वात मोठी स्पर्धा मानलं जाणारं टी–२० विश्वचषक भारतात सुरु आहे. काही सामने श्रीलंकेत झाले होते, तर दोन उपांत्य सामने आणि अंतिम सामना आता भारतात होणार आहेत. टी–२० विश्वचषक २०२६ चा अंतिम सामना ८ मार्च रोजी अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी क्रिकेट स्टेडियमवर होणार आहे. भारतीय संघ सध्या उपांत्य फेरीत पोहाेचला आहे, ज्यात ५ मार्च रोजी ईडन गार्डन्सवर त्यांचा सामना इंग्लंडशी होईल. हा सामना जो संघ जिंकेल तो अंतिम फेरीत पोहोचेल. सामन्यावरुन राजकारण तापलं : दरम्यान, भारतातील राजकीय पक्षांनी विश्वचषकाच्या आयोजनाबाबत वादग्रस्त विधाने करण्यास सुरुवात केली आहे. भारतीय संघ फक्त उपांत्य फेरीत पोहोचला आहे, परंतु काँग्रेस पक्षानं या स्पर्धेबाबत आधीच वादग्रस्त विधानं करण्यास सुरुवात केली आहे. अशातच, काँग्रेसच्या एका वरिष्ठ नेत्यानं पंतप्रधान नरेंद्र मोदींबद्दल एक वादग्रस्त विधान केलं आहे.हुसेन दलवाई यांचं वादग्रस्त विधान : काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि राज्यसभा खासदार हुसेन दलवाई यांनी बुधवारी टी–२० विश्वचषक अंतिम सामना अहमदाबादऐवजी मुंबईत आयोजित करावा असं म्हटलंय. ते म्हणाले की मुंबई हे क्रिकेटचं खरं माहेरघर मानलं जातं आणि म्हणूनच या शहरात अंतिम सामन्यासारखा मोठा सामना आयोजित केला पाहिजे. दलवाई म्हणाले, ''अंतिम सामना अहमदाबादमध्ये आयोजित करण्याचं नियोजन तसं नसावं. उपांत्य सामना तिथंच व्हायला हवा, पण अंतिम सामना मुंबईतच व्हायला हवा.''पंतप्रधानांवर टीकास्त्र : त्यांनी आपल्या विधानात पंतप्रधान नरेंद्र मोदींवरही टीका केली. ते म्हणाले, ''मोदीजी अनलकी असल्याचं सिद्ध झाले आहे. आपण तिथं आधीच एकदा हरलो आहोत, आपल्याला पुन्हा तोच अनुभव घेण्याची गरज आहे का?'' दलवाई यांच्या विधानाकडे राजकीय दृष्टिकोनातूनही पाहिलं जात आहे, कारण त्यांनी अहमदाबादमध्ये अंतिम सामना आयोजित करण्याच्या संभाव्य योजनेवर थेट प्रश्नचिन्ह उपस्थित केलं.

# फिन एलनने शतकासह रचला वर्ल्ड रेकॉर्ड

**नवी दिल्ली:**टी२० वर्ल्डकप स्पर्धेत बुधवारी कोलकाता इथल्या इडन गार्डन्स मैदानाव फिन ॲलन नावाचं वादळ घोंघावलं. या वादळात दक्षिण आफ्रिकेचा संघ नेस्तनाबूत झाला. ॲलनने अवघ्या ३३ चेंडूत शतकाला गवसणी घालत अनेक विक्रम नोंदवले. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे या शतकाच्या बळावर न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेला नमवत फायनलमध्ये धडक मारली.

२६वर्षीय उंचपुरा ॲलन ताकदीच्या बळावर अचंबित करणारे फटके लगावतो. कागिसो रबाडा, लुंगी एन्गिडी तसंच मार्को यान्सन या दर्जेदार आक्रमणाविरुद्ध खेळताना ॲलनने भात्यातले सगळी शस्त्रं परजली. स्टंप्सच्या अक्रॉस जाऊन फाईनलेग क्षेत्रात षटकार खेचण्याचं त्याचं कसब विलक्षण आहे.

२०२१ मध्ये ॲलनने न्यूझीलंडसाठी पदार्पण केलं. ६१ टी२० सामन्यात न्यूझीलंडचं प्रतिनिधित्व करताना



### ३३ चेंडूत शतकासह न्यूझीलंडला फायनलमध्ये नेणारा फिन ॲलन आहे तरी कोण?

ॲलनने १७१.०४च्या स्ट्राईकरेटने १६५४ धावा केल्या असून यामध्ये ३ शतकं आणि ७ अर्धशतकांचा समावेश आहे. पदार्पणात भोपळाही फोडू न शकणाऱ्या ॲलनने ११व्या सामन्यात स्कॉटलंडविरुद्ध शतक झळकावलं

- **आयपीएलमध्ये कोणत्या संघाकडून खेळतो?**
- **फिन ॲलनने टी२० वर्ल्डकपमध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध**
- **३३ चेंडूत शतक झळकावलं.**



होतं. २०२४ मध्ये ॲलनने ड्युनेडिन इथे पाकिस्तानविरुद्ध ९४ चेंडूत १६ षटकार आणि ५ चौकारांसह १३७ धावांची मॅरेथॉन खेळी साकारली होती.

आयपीएल प्रवास

फेब्रुवारी २०२१ मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने ॲलनला संघात समाविष्ट केलं. जोश फिलीप वैयक्तिक कारणास्तव संपूर्ण हंगाम खेळू शकणार नसल्याने बंगळुरूने ॲलनचा समावेश केला. लिलावात ॲलन अनसोल्ड गेला होता. फलंदाजीप्रमाणे यष्टीरक्षणही करू शकत असल्याने फिलीपला लाईक अ लाईक रिप्लेसमेंट म्हणून ॲलनला प्राधान्य देण्यात आलं. ॲलनने न्यूझीलंडमधल्या सुपर स्मॅश स्पर्धेच्या २०२०–२१ हंगामात ५१२ धावा केल्या होत्या. यामध्ये २५ षटकारांचा समावेश होता

ॲलनला अंतिम अकरात स्थान मिळू शकलं नाही मात्र विराट कोहली, एबी डीव्हिलियर्स, ग्लेन मॅक्सवेल यासारख्या मोठ्या खेळाडूंबरोबर खेळण्याचा अनुभव मोलाचा होता असं ॲलनने क्रिकबझ संकेतस्थळाशी बोलताना सांगितलं.

# भारत आणि इंग्लंड यांच्यातील सेमी फायनल मॅचचे तिकीट मिळवण्याची शेवटची संधी?



### एका तिकिटासाठी किती रुपये मोजावे लागण–

मुंबई–भारत आणि इंग्लंड यांच्यातील टी २० वर्ल्ड कप २०२६ च्या उपांत्य फेरीतील दुसरा सामना मुंबईत वानखेडे स्टेडियमवर होणार आहे. तर, टी २० वर्ल्ड कपचा अंतिम सामना ८ मार्चला गुजरातमधील अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणार आहे. भारत आणि इंग्लंड यांच्यातील सामना मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर जाऊन पाहायचं तुमचं नियोजन असेल तर एक चांगली संधी आहे.

टी २० वर्ल्ड कपच्या सामन्यांची तिकीटं बुक माय शो या प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहेत. अतिरिक्त तिकीटांची विक्री करण्यात येणार असल्याचं बुक माय शोकडून सांगण्यात आलं आहे. आज सायंकाळी ६ वाजता ही विक्री सुरु होईल. बुक माय शोच्या वेबसाईटवरील माहितीनुसार एका तिकिटाची किंमत १००० रुपये असेल. ज्या चाहत्यांना मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर जाऊन उपांत्य फेरीतील भारत आणि इंग्लंड यांच्यातील सामना पाहायला असेल ते बुक माय शोच्या वेबसाईटला भेट देऊन तिकीट बुक करु शकतात. भारताच्या संघातील काही खेळाडूंनी आज मुंबईच्या सिद्धीविनायक मंदिराला भेट दिली.

सूर्यकुमार यादवच्या नेतृत्त्वात वर्ल्ड कप जिंकण्यासाठी भारतीय संघ सज्ज झाला आहे. इंग्लंड विरूद्धच्या सामन्यात भारतीय संघ वेस्ट इंडिज विरूद्धच्या सामन्यात ज्यांना संधी दिली त्यांच्यासह मैदानात उतरणार की संघात काही बदल करणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

भारत की इंग्लंड कोण वरचढ?

टी २० वर्ल्ड कपमध्ये भारत आणि इंग्लंड ५ वेळा आमने सामने आले आहेत.भारतानं तीनवेळा विजय मिळवला तर इंग्लंडनं दोन वेळा विजय मिळवला. पाच पैकी २ वेळा भारत आणि इंग्लंड उपांत्य फेरीत आमने सामने आले. इंग्लंडनं २०२२ मध्ये भारताला १० विकेटनं पराभूत केलं. तर २०२४ मध्ये भारतानं उपांत्य फेरीत इंग्लंडला पराभूत केलं.त्या विजयासह भारतानं बदला पूर्ण केला होता. टी२० मध्ये हेड टू हेड–आंतर्राष्ट्रीय टी२० क्रिकेटमध्ये भारत आणि इंग्लंड २९ वेळा आमने सामने आले आहेत. भारताने १७ वेळा विजय मिळवला तर इंग्लंडने १२ वेळा विजय मिळवला आहे. २०२६ टी२० वर्ल्ड कपमध्ये भारत आणि इंग्लंड यांची कामगिरी सारखीच राहिली आहे. दोन्ही संघानी ७– ७ सामने खेळले आहेत. यात दोन्ही संघांचा एकदा पराभव झाला आहे. भारत ग्रुप स्टेजमध्ये पहिल्या स्थानावर होता. तर, इंग्लंड सुपर ८ च्या ग्रुप २ मध्ये पहिल्या स्थानावर होता. दोन्ही संघांची कामगिरी सारखीच दिसत असली तरी जुनी आकडेवारी भारताच्या बाजूने आहे.भारताचा संपूर्ण संघ– सूर्यकुमार यादव (कर्णधार), अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, संजू सॅमसन, शिवम दुबे, इशान किशन, हार्दिक पांड्या, अर्शदीप सिंग, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, वरुण चक्रवर्ती, कुलदीप यादव, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, रिंकू सिंग.

### सलग ५ विजय, इंग्लिश कॅप्टनने ओलांडली सीमा; टीम इंडियाला दिले खुले चॅलेंज

दिल्ली–इंग्लंडचा कर्णधार हॅरी ब्रूक टी–२० विश्वचषकात सलग पाच विजय मिळवल्यानंतर प्रचंड आत्मविश्वासात आहे. भारताविरुद्धच्या हायव्होल्टेज उपांत्य फेरीच्या एक दिवस आधी त्याने सूचक शब्दांत स्पष्ट केले. मफआम्ही कधीच खेळातून बाहेर नसतो. दबाव टोकाला पोहोचला की आमचा खेळ अधिक उंचावतो.ग्लंडने गट टप्प्यात नेपाळ, स्कॉटलंड आणि इटली यांच्यावर दणदणीत विजय मिळवत पुढची फेरी गाठली. मात्र वेस्ट इंडिजविरुद्ध त्यांना मोठा पराभव पत्करावा लागला. तरीही सुपर–८ फेरीत ब्रूकच्या नेतृत्वाखाली इंग्लंडने श्रीलंका, पाकिस्तान आणि न्यूझीलंड यांच्याविरुद्ध अपराजित राहून उपांत्य फेरीत दमदार प्रवेश केला.स्काय स्पोर्ट्स क्रिकेटशी बोलताना ब्रूक म्हणाला, मफआम्ही सामने जिंकतो आहोत, ही चांगल्या संघाची खूण आहे. मी एक गोष्ट शिकलो आहे, सामना संपेपर्यंत आपण कधीच बाहेर नसतो. माझ्याकडे प्रचंड कॅरेक्टर असलेले खेळाडू आहेत. ते जिंकण्याची तीव्र इच्छा बाळगतात आणि दबावातही शांत राहतात.फ्फ त्याच्या मते, याच आत्मविश्वासामुळे इंग्लंड यजमान भारताविरुद्धच्या सेमीफायनलमध्ये अधिक मजबूत ठरतो. इंग्लंडच्या आक्रमक विचारसरणीवर भर देताना तो म्हणाला, मफ्मी नेहमी फलंदाजांसाठी शक्य तितकं कठीण वातावरण निर्माण करू इच्छितो.टॉप ऑर्डरला ठाम पाठिंबा...व्हाईट–बॉल क्रिकेटमधील दिग्गज जोस बटलर याचा अपेक्षित फॉर्म नसतानाही आणि फिल सॉल्ट सातत्य राखू न शकल्यानेही ब्रूकने आपल्या टॉप ऑर्डरला पूर्ण पाठिंबा दिला आहे.

### पाकिस्तान टीमची घोषणा अन् कराची ते लाहोरमध्ये खळबळ!



कराची–टी–२० वर्ल्ड कपमधील निराशाजनक कामगिरीनंतर पाकिस्तान क्रिकेटमध्ये मोठे बदल दिसून येत आहेत. वरिष्ठ खेळाडूंवर कारवाई झाली असून युवा आणि नव्या चेहऱ्यांना संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डने बांगलादेश दौऱ्यासाठी १५ जणांचा एकदिवसीय संघ जाहीर केला आहे. पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्यातील तीन सामन्यांची ओडीआय मालिका ११ ते १५ मार्चदरम्यान खेळवली जाणार असून सर्व सामने ढाका येथील शेर–ए–बांगला राष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम येथे होतील. संघाची धुरा पुन्हा एकदा डावखुरा वेगवान गोलंदाज शाहीन शाह आफ्रिदी याच्याकडे सोपवण्यात आली आहे.

६ अनकॅप्ड खेळाडूंना संधी

या संघात ६ अशा खेळाडूंचा समावेश आहे, ज्यांना अद्याप एकदिवसीय क्रिकेटमध्ये पदार्पणाची संधी मिळालेली नाही. त्यामध्ये अब्दुल समद, माज सदाकत, मोहम्मद गाजी घोरी, साद मसूद, साहिबजादा फरहान आणि शमील हुसैन यांचा समावेश आहे.

यापैकी अब्दुल समद, माज सदाकत, साद मसूद आणि शमील हुसैन यांनी अलीकडेच पाकिस्तान शाहीन संघाकडून अबू धाबी येथे इंग्लंड लायन्सविरुद्ध सामने खेळले होते. युवा खेळाडूंवर विश्वास दाखवत संघ व्यवस्थापनाने भविष्यातील बांधणीचा स्पष्ट संदेश दिला आहे.

बाबर, फखर आणि सॅम अयुब बाहेर

सर्वात मोठा धक्का म्हणजे स्टार फलंदाज बाबर आझम, फखर झमान आणि सॅम अयुब यांना ध्ध संघातून वगळण्यात आले आहे. तसेच वेगवान गोलंदाज नसीम शाहलाही संघात स्थान मिळालेले नाही. टी–२० वर्ल्ड कपमध्ये पाकिस्तानची कामगिरी अत्यंत निराशाजनक ठरली. संघ सुपर–८ फेरीतच बाद झाला. स्पर्धेत बाबर आजमला अपेक्षित कामगिरी करता आली नाही. संथ खेळी आणि दबावाच्या क्षणी धावा करण्यात अपयश आल्याने त्याच्यावर टीका झाली. त्यामुळेच त्याला एकदिवसीय संघातूनही बाहेर ठेवण्यात आल्याचे मानले जात आहे.

लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे, बाबर आजमने आपली शेवटची ध्ध मालिका नोव्हेंबरमध्ये श्रीलंकेविरुद्ध रावळपिंडी येथे खेळली होती आणि त्या मालिकेत त्याने नाबाद शतकही झळकावले होते. तरीदेखील झ्ँ ने अलीकडील खराब फॉर्म लक्षात घेऊन हा कठोर निर्णय घेतल्याचे दिसते.

बांगलादेशविरुद्ध ध्ध मालिकेसाठी पाकिस्तान संघ

शाहीन शाह आफ्रिदी (कर्णधार), अब्दुल समद, अबरार अहमद, फहीम अशरफ, फैसल अकरम, हारिस रऊफ, हुसैन तलत, माज सदाकत, मोहम्मद रिझवान (यष्टिरक्षक), मोहम्मद वसीम ज्युनियर, मोहम्मद गाजी गोरी (यष्टिरक्षक), साद मसूद, साहिबजादा फरहान, सलमान अली आगा आणि शमील हुसैन.

पाकिस्तान ीं बांगलादेश जऊख मालिकेचे संपूर्ण वेळापत्रक

११ मार्च – पहिला जऊख, ढाका

१३ मार्च – दुसरा जऊख, ढाका

१५ मार्च – तिसरा जऊख, ढाका

# जिंकण्याची कोणतीच हमी नाही; इंग्लंडविरुद्ध सामन्याआधी टीम इंडियाच्या कोचचे धक्कादायक विधान



दिल्ली–टी–२० विश्वचषक स्पर्धेचा गतविजेता असलेला भारत सुरुवातीला प्रबळ दावेदार मानला जात होता. मात्र आतापर्यंतचा प्रवास चढ–उतारांनी भरलेला राहिला. वेस्ट इंडिजविरुद्ध 'करो किंवा मरो' परिस्थितीत टीम इंडियाने कसाबसा विजय मिळवत उपांत्य फेरी गाठली. आता उपांत्य फेरीत भारतासमोर आता इंग्लंडचं मोठं आव्हान उभं आहे. या मोठ्या लढतीपूर्वी गोलंदाजी प्रशिक्षक मॉर्ने मॉर्केल यांनी स्पष्ट शब्दांत सांगितलं की, आता फक्त जिंकण्यावर लक्ष केंद्रित करणं महत्त्वाचं आहे, कारण या टप्प्यावर फक्त निकालालाच अर्थ असतो.

इंग्लंडला रोखणं सोपं नाही...

मुंबईत झालेल्या पत्रकार परिषदेत मॉर्केल म्हणाले, ''इंग्लंड उत्तम संघ आहे. ते आक्रमक क्रिकेट खेळतात. आपण त्यांना १२०–१५० धावांत गुंडाळू, अशी अपेक्षा ठेवणं वास्तववादी नाही. आपण उपांत्य फेरीत आहोत, कारण आतापर्यंत जिंकत आलो आहोत. भारतात विजय–पराजयातील फरक फारच कमी असतो.'' ते पुढे म्हणाले, ''उपांत्य फेरीपर्यंत कसे पोहोचलो, हे महत्त्वाचं नाही. महत्त्वाचं आहे पुढील दोन सामन्यांत आपण कसं खेळतो.''जिंकण्याची कोणतीच हमी नाही, पण संधी नक्की असते....

मॉर्केल यांनी परफेक्ट मॅच या संकल्पनेवर भर न देता संघाच्या क्षमतेवर विश्वास व्यक्त केला. ''आमच्याकडे प्रतिभावान खेळाडू आहेत. गरज पडली तर कोणताही खेळाडू सर्वोत्तम कामगिरी करू शकतो. शेवटच्या दोन सामन्यांतही चांगली कामगिरी होईल, अशी अपेक्षा आहे. क्रिकेटमध्ये जिंकण्याची कोणतीही हमी नसते. पण मैदानात उतरून सर्वोत्तम देण्याची संधी नक्की असते, आणि आम्ही त्यासाठी सज्ज आहोत,'' असे ते म्हणाले.

इंग्लंडची ताकद लक्षात घेणे गरजेचे

मॉर्केल यांनी इंग्लंडला अत्यंत धोकादायक संघ ठरवत त्यांच्या फलंदाजीची खोली आणि गोलंदाजीतील विविधता अधोरेखित केली. ''त्यांच्याकडे अनेक प्रतिभावान खेळाडू आहेत. फलंदाजीमध्ये खोली आहे, तर गोलंदाजीत विविध पर्याय आहेत. हीच त्यांची खरी ताकद आहे,'' असे त्यांनी नमूद केले. गेल्या वर्षी इंग्लंडवर मिळवलेला विजय आता अप्रासंगिक असल्याचं सांगत मॉर्केल म्हणाले की, ''प्रत्येक सामना वेगळा असतो. गुरुवारी दोन आक्रमक

## डॉ. जे. एम. वाघमारे यांना राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातर्फे श्रध्दांजली

**लातूर/प्रतिनिधी :** 'लातूर पॅटर्न'चे जनक, माजी कुलगुरू, माजी खासदार डॉ. जनार्दन वाघमारे यांना राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाच्यावतीने संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते डॉ. वाघमारे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

थोर विचारवंत, लातूरचे माजी नगराध्यक्ष डॉ. जे. एम. वाघमारे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने सोमवारी सकाळी निधन झाले. मंगळवारी त्यांच्या पार्थिवावर कवठा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान, राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील राजमाता जिजामाता प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, राजमाता जिजामाता बी. एड. कॉलेज, संगमेश्वर अध्यापक विद्यालय, तुळजाभवानी इंग्लिश स्कूल, तुळजाभवानी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, संगमेश्वर प्राथमिक विद्यामंदिर येथे डॉ. जे. एम. वाघमारे यांना श्रध्दांजली अपर्ण करण्यात आली.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक अशविनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, प्राचार्य जी. आर. मुंडे, समन्वयक राजीव मुंढे, राजेंद्र जायेभाये, प्राचार्य डॉ. आर. एम. चव्हाण, डॉ. नाजनीन सय्यद, प्राचार्य अरुण करदुरे, मुख्याध्यापक अविनाश पवार, पर्यवेक्षक संजय गुरमे, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते, शिवकांत वाडीकर यांच्यासह शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## प्राचीनकालीन कला व स्थापत्याच्या संशोधनात विद्यार्थ्यांचा सहभाग आवश्यक : डॉ. सचिन हंचाटे

### एम.ओ.यू. अंतर्गत अतिथी व्याख्यानाचे आयोजन




**लातूर/प्रतिनिधी :** प्राचीनकालीन कला व स्थापत्याच्या संशोधनात विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग आवश्यक असून तेर, जि. धाराशिव येथे सद्यस्थितीत उपलब्ध असलेले सर्व प्राचीन स्थापत्य हा मौलिक सांस्कृतिक ठेवा असून त्याचे जतन व संवर्धन केले पाहिजे असे प्रतिपादन डॉ. सचिन हंचाटे यांनी केले.महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील इतिहास विभागाच्यावतीने सामंजस्य करार (एम.ओ.यू.) अंतर्गत ओळख प्राचीनकालीन पर्यटन केंद्राची-विशेष संदर्भ तगर (तेर), जि. धाराशिव या विषयावर आयोजित अतिथी व्याख्यानाचे प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आनंद शेवाळे हे होते. तर व्यासपीठावर इतिहास विभागप्रमुख डॉ. सदाशिव दंदे, प्रा. अनुराधा महाजन, इतिहास अभ्यास मंडळाच्या सचिव तमन्ना शेख उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. सचिन हंचाटे यांनी इतिहासाच्या भौतिक साधनांचा आढावा घेऊन तेर येथील कै. रामलिंगप्पा लामतुरे शासकीय वस्तु संग्रहालय, त्रिविक्रम, उत्तरेश्वर व कालेश्वर इत्यादी मंदिराबद्दल संदर्भासह माहिती दिली. तसेच संत गोरोबा यांचे वारकरी सांप्रदायातील मौलिक योगदान सांगितले. इतिहास विषयाचे स्पर्धा परीक्षेतील महत्त्व, इतिहास विषयाच्या रोजगार व स्वयंरोजगार क्षेत्रातील विविध संधी, विविध कला-कौशल्ये याबद्दल विद्यार्थ्यांना सविस्तर अवगत केले. विद्यार्थ्यांनी आपल्या दैनंदिन अध्ययनासोबतच व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करून ठरविलेले ध्येय-करिअर साध्य करावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. मार्गदर्शनपर व्याख्यानानंतर विद्यार्थी व अतिथी यांच्यात अनुषंगिक प्रश्नोत्तराचे सत्र पार पडले.

अध्यक्षीय समारोपात प्रभारी प्राचार्य डॉ. आनंद शेवाळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून इतिहास विभागाच्यावतीने एम.ओ.यू.अंतर्गत संपन्न अतिथी व्याख्यान व तेर, जि.धाराशिव येथील नियोजित शैक्षणिक अभ्यास सहल या उपक्रमांना शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी अलका पवार (एम.ए.द्वितीय वर्ष) यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच अवंतिका यादव व साक्षी घोडके यांनी कविता सादर केली.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून इतिहास विभागप्रमुख डॉ. सदाशिव दंदे यांनी प्राचीन काळातील सातवाहन घराणे व तेर, जि.धाराशिव याबद्दल मौलिक मार्गदर्शन करून इतिहास विभागाच्या वतीने आयोजित विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साक्षी घोडके यांनी केले व उपस्थितांचे आभार अवंतिका यादव यांनी मानले.यावेळी पदवी व पदव्युत्तर इतिहास विभागाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत यांच्या तर्फे

# रामेश्वर येथे राष्ट्रधर्मपूजक - दादाराव कराड स्मृती महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी स्पर्धेचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ यांच्या मान्यतेने राष्ट्रधर्मपूजक-दादाराव कराड स्मृती प्रित्यर्थ लातूर येथील विश्वधर्मी मानवतातीर्थ रामेश्वर (रुई) येथे राज्यस्तरीय महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी स्पर्धा-२०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा मंगळवार, दि. १० मार्च २०२६ रोजी होणार आहे. स्पर्धेतील सर्वश्रेष्ठ विजेत्या मल्लास रोख रूपये १,२५,०००/- चांदीची गदा, मेडल व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी कुस्ती खेळाडूसह क्रीडा प्रेमींनी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आ. रमेशअप्पा कराड यांनी केले आहे.

माईर्स एमआयटी शिक्षण समूहाचे कार्यकारी अध्यक्ष व व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. राहुल वि. कराड यांच्या मार्गदर्शनात ही स्पर्धा संपन्न होणार आहे. स्पर्धेचे उद्धाटन मंगळवार, दि. १० मार्च २०२६ रोजी सकाळी ९ वाजता होणार आहे. तसेच, पारितोषिक वितरण समारंभ याच दिवशी सायं. ७ वा. होणार आहे. समारंभास ट्रिपल महाराष्ट्र केसरी आणि अर्जुन अवॉर्डी पै. नरसिंग यादव प्रमुख पाहुणे तसेच, हिंद केसरी पै. जगदीश कालीरमण हे विशेष सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. हिंद केसरी पै. दिनानाथ सिंग, महाराष्ट्र केसरी पै. आप्पासाहेब कदम, महाराष्ट्र केसरी आणि महाराष्ट्र श्री पै. विजय उर्फ विकी बनकर हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. रामेश्वर (रुई) चे माजी सरपंच तुळशीराम दा. कराड हे प्रमुख मार्गदर्शक आहेत. विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या अध्यक्षतेखाली ही स्पर्धा होणार आहे.

राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे हे १९ वे वर्ष आहे. यासाठी महाराष्ट्रातील नामवंतासह देशभरातील मल्लांना निमंत्रीत केले आहे. राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेतील महावीर केसरी गटातील सर्वश्रेष्ठ विजेत्या मल्लास महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी हा अत्यंत बहुमानाचा किताब, रोख रूपये १,२५,०००/- चांदीची गदा व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. द्वितीय क्रमांकास रोख रूपये १,००,०००/-, तृतीय क्रमांक ५० हजार आणि चतुर्थ क्रमांकास २५ हजार रूपये यासह वजन गट ५७,



६१, ६५, ७०, ७४, ८६ आणि ८६ प्लस ते १२५ किलो वजन गटातील विजेत्या मल्लांना गटनिहाय हजारो रूपयांची पारितोषिके, सुवर्ण, रौप्य, कास्यं पदक, मेडल, प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच, उपांत्यपूर्व फेरीमध्ये पोहोचलेल्या सर्व कुस्तीगीरांना मानधन देण्यात येईल. थोर स्वातंत्र्य सेनानी, राष्ट्रीय कीर्तनकार, आरोग्य शास्त्रातील एक महान चमत्कार, योग महर्षि शतायुषी वै. रामचंद्र गोपाळ शेलार उर्फ शेलारमामा यांच्या स्मृतिप्रित्यर्थ तंदुरूस्त अशा पंच्चाहत्तर वर्षे वयाच्या पुढील मल्लांसाठी याच दिवशी एक आगळी वेगळी कुस्तीस्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. विजेत्यांना योग महर्षी वै. रामचंद्र गोपाळ शेलार उर्फ शेलारमामा स्मृती सुवर्ण, रौप्य, कांस्य गौरव पदक बहाल करण्यात येईल.

सर्व मल्लांची वजने सोमवार दि. ९ मार्च २०२६ रोजी सायं. ४ ते ८ पर्यंत घेतली जातील. सर्व कुस्तीगीरांनी आधारकार्डची मूळ प्रत व त्याची झेरॉक्स प्रत आणणे बंधनकारक आहे. स्पर्धा राज्य संघटनेच्या नियमानुसार घेण्यात येणार आहे. या स्पर्धेत भाग घेण्यासाठी कोणतीही प्रवेश फी आकारली जाणार नाही. स्पर्धेसाठी येणाऱ्या सर्व कुस्तीगीरांच्या जाण्या-येण्याचे एस.टी.भाडे, निवासाची व भोजनाची व्यवस्था संयोजकांतर्फे करण्यात येईल. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रा. विलास कथुरे (मो. नं.९८५०२११४०४), पै. राहुल बिराजदार (मो.नं.८००७५९३४३४), यांच्याशी संपर्क साधावा. या स्पर्धेत जास्तीत जास्त मल्लांनी सहभागी व्हावे. त्याच बरोबर या कुस्ती स्पर्धेसाठी क्रीडाप्रेमींनी हजारोच्या संख्येने उपस्थित रहावे. असे आवाहन महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी स्पर्धा संयोजन समितीचे सचिव प्रा. विलास कथुरे, एमआयटी डब्ल्यूपीयूचे कुलगुरू डॉ. आर. एम. चिटणीस, डॉ. महेश थोरवे आणि क्रीडा विभागाचे संचालक डॉ. वैभव वाघ यांच्यासह संयोजन

## वंचितांच्या हक्कासाठी मानवी हक्क अभियान अधिक बळकट: अरुण कुमार (बाबासाहेब) माने यांची जिल्हा मुख्य सल्लागारपदी नियुक्ती!



धाराशी प्रतिनिधी:

धाराशिव येथे दि.०२ मार्च २०२६ रोजी मानवी हक्क अभियानच्या जिल्हा कमेटीची बैठक उत्साहात पार पडली. बैठकीच्या अनुषंगाने संघटनेचे जिल्हाध्यक्ष कैलास पवार यांच्या हस्ते अरुण कुमार उर्फ बाबासाहेब माने (रा. बेंबळी, ता. जि. धाराशिव) यांची धाराशिव जिल्हा मुख्य सल्लागार म्हणून नियुक्ती जाहीर करून त्यांना अधिकृत नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

नियुक्तीपत्रात जिल्ह्यातील वंचित, पीडित व उपेक्षित घटकांसाठी प्रभावीपणे कार्य करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली असून, संघटनेच्या उद्दिष्टपूर्तीसाठी जबाबदारीने काम करावे, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. अरुणकुमार माने यांच्या नियुक्तीमुळे संघटनेच्या कार्याला अधिक बळ मिळणार असल्याचे मत यावेळी व्यक्त करून पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.

या बैठकीस जिल्हा कार्याध्यक्ष खालीद पटेल, जिल्हा उपाध्यक्ष श्रीकांत वाघे, धाराशिव तालुका अध्यक्ष जनार्दन वाळवे, तुळजापूर तालुका अध्यक्ष तानाजी खाडेकर, कैलास कांबळे तसेच अरुण माने आदी मान्यवर उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत लातूर शहरातील कबाल्यांचे वाटप करावे

### नगरसेविका राजश्री धोत्रे - बाहेती यांची तहसिलदारांकडे मागणी

**लातूर/प्रतिनिधी :** महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी संपूर्ण राज्यभरात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान राबविण्याचा निर्णय घेतला आहे. मार्च ते मे या कालावधीमध्ये हे अभियान पार पडणार असून या माध्यमातून नागरिकांच्या महसुल विभागांतर्गत असलेल्या विविध समस्यांचे समाधान करण्यात येणार आहे. या शिबिराच्या माध्यमातून लातूर शहरातील कबाले धारकांचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी भाजपाच्या प्रभाग १६ मधील नगरसेविका राजश्री धोत्रे बाहेती यांनी तहसीलदार सौदागर तांदळे यांच्याकडे पत्रकाद्वारे केली आहे.

लातूर शहरातील प्रभाग क्र. १६ सह विविध प्रभागातील अनेक नागरिकांचे कबाले अद्यापपर्यंत प्रशासनाने दिलेले नाहीत. कबाले मिळाले नसल्यामुळे या नागरिकांना शासनाच्या विविध योजनांपासून वंचित रहावे लागत आहे. त्यामुळे हे कबाले वाटप करण्यात यावे, अशी मागणी सातत्याने नागरिकांतून होत आहे. ही लोकभावना लक्षात घेवून महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मनपा निवडणुकीदरम्यान लातूर शहरातील नागरिकांना लवकरात लवकर कबाले वाटप करण्यात येईल, असे आश्वासित केले होते. आता निवडणुका पार पडल्या असून नुकतेच महसुल मंत्री बावनकुळे यांनी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाची घोषणा केली आहे. या अभियानाच्या माध्यमातून महसुल विभागांतर्गत नागरिकांच्या असलेले समस्या तात्काळ सोडविण्याचे निर्देश ना. बावनकुळे यांनी दिलेले आहे. सदर अभियान मार्च २०२६ ते मे २०२६ पर्यंत राबविण्यात येणार आहे.

लातूरही या अभियानाची सुरुवात झाली असून नागरिकांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी प्रशासनाने तयारी सुरु केली आहे. याच अभियानांतर्गत लातूर शहरासह प्रभाग १६ मधील नागरिकांच्या कबाल्याचे वाटप करण्याची मागणी नगरसेविका राजश्री धोत्रे बाहेती यांनी तहसीलदार सौदागर तांदळे यांच्याकडे केली आहे. याकरिता तहसील प्रशासनाने मनपा प्रशासनासोबत बैठक घेवून कबाले वाटपासंदर्भात असलेली प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करून याबाबत तात्काळ निर्णय घ्यावा, अशीही मागणी राजश्री धोत्रे बाहेती यांनी केली आहे.त्याचबरोबर या अभियानाच्या माध्यमातून संजय गांधी निराधार योजना, लाडक्या बहिणींची ई- केवायसी करणे, शिधा पत्रिकांमध्ये नावांची खातरजमा करून घेवून त्यामध्ये नावे कमी - जास्त करणेयासह शैक्षणिक प्रवेशासाठी लाणाया विविध कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी शिबिर घेण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. या मागण्यांबाबत तहसीलदार तांदळे यांनी सकारात्मकता दाखवली असून कबाले वाटपासंदर्भात लवकरात लवकर निर्णय घेवून अशी ग्वाही दिली आहे.

# ''रीड लातूर''तर्फे विविध स्पर्धा; ३००० विद्यार्थ्यांचा सहभाग

### रीड लातूर संस्थापक सौ. दीपशिखाताई धिरज देशमुख व धिरज विलासराव देशमुख यांच्या संकल्पनेतून पार पडल्या स्पर्धा

**लातूर/प्रतिनिधी :** रीड लातूर या उपक्रमांतर्गत प्रकट वाचन, निबंध लेखन व काव्यलेखन स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. वाचन संस्कृती जोपासली जावी आणि विद्यार्थ्यांमध्ये भाषिक तसेच सर्जनशील गुणांचा विकास व्हावा या उद्देशाने मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधत रीड लातूर उपक्रमाचे संस्थापक सौ.दीपशिखाताई धिरज देशमुख व श्री धिरज विलासराव देशमुख यांच्या संकल्पनेतून या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. रीड लातूर उपक्रम ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी गेल्या चार वर्षांपासून सातत्याने राबविण्यात येत आहे.

या स्पर्धेस लातूर, रेणापूर व औसा तालुक्यातील ८० जिल्हा परिषद शाळांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला





असून सुमारे ३००० विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदविला. यापैकी ८०० विद्यार्थी प्रथम, द्वितीय व उत्तेजनार्थ क्रमांकाने विजयी ठरले आहेत. विजेत्या विद्यार्थ्यांना रीड लातूर उपक्रम संस्थापकांच्या सहीचे प्रमाणपत्र व मेडल देऊन गौरविण्यात येणार आहे.

स्पर्धांचे आयोजन शालेय स्तरावर करण्यात आले. गट १ (इ. १ ते ५), गट २ (इ. ६ ते ८) आणि गट ३ (इ. ९ व १०) अशा तीन गटांमध्ये स्पर्धा घेण्यात आल्या. प्रकट वाचन स्पर्धेत लहान गटासाठी परिचित तर मोठ्या गटासाठी अपरिचित उताऱ्यांचे वाचन घेण्यात आले. आवाजातील चढ-उतार, विरामचिन्हांची दखल, वाचनशैली आदी निकषांवर शालेय स्तरावर मूल्यमापन करण्यात आले.

निबंध लेखन स्पर्धेसाठी ''माझ्या स्वप्नातील गाव'', ''माझ्या स्वप्नातील शाळा'', ''मला आवडलेले पुस्तक'', ''मला आवडलेले कवी अथवा लेखक'' असे विषय देण्यात आले. हस्ताक्षर, आशय मांडणी, कल्पकता व नाविन्य यावर आधारित परीक्षण करण्यात आले. काव्यलेखन स्पर्धेत निसर्ग, परिसर व विद्यार्थ्यांचे भावविश्व या विषयांवर विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त कविता सादर केल्या.




स्पर्धा निकोप व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्या. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळावे आणि त्यांच्यातील भाषिक अभिव्यक्ती अधिक बळकट व्हावी, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू असल्याचे आयोजकांनी सांगितले.

ही स्पर्धा यशस्वी पार पाडण्यासाठी जिल्हा परिषद, शिक्षण विभाग, मुख्याध्यापक, शिक्षक व शालेय व्यवस्थापन समिती यांचे मोलाचे सहकार्य लाभले असल्याचे उपक्रमाचे समन्वयक राजू सी.पाटील यांनी नमूद केले.

स्पर्धेत सहभागी व विजयी सर्व विद्यार्थ्यांचे रीड लातूर तर्फे अभिनंदन करण्यात आले आहे.

## लातूर शहरातील झोपडपट्टीधारकांना घरकूल योजनांचा लाभ द्या

### बालाजी सेवाभावी संस्थेची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरातील खाजगी व शासकीय जागेत झोपड्या करून वास्तव्यास असलेल्या मागासवर्गीय व श्रमिक कुटुंबांना घरकूल योजनांचा लाभ देण्यात यावा, अशी मागणी बालाजी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, सलगरा (बु.), ता. लातूर, जि. लातूर यांच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

संस्थेचे अध्यक्ष वैजनाथ साधू डावळे व सचिव सुमन बालाजी गायकवाड यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, लातूर शहरातील विलासनगर परिसर, यशवंत शाळेजवळील वस्ती तसेच समतानगर येथील बुद्ध गार्डन परिसरात अनेक वर्षांपासून मागासवर्गीय व श्रमिक कुटुंबे वास्तव्यास आहेत. काहींना जागेचे कबाले मिळाले असले तरी अनेक कुटुंबे अद्याप वंचित आहेत.

ही बाब शासकीय धोरणाच्या विरोधात असून पात्र लाभार्थ्यांना घरकूल योजनांचा लाभ मिळत नसल्याची खंत संस्थेने व्यक्त केली आहे. संबंधित कुटुंबांना इंदिरा आवास योजना, प्रधानमंत्री आवास योजना तसेच रमाई घरकूल योजना यांचा लाभ तात्काळ देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच, लातूर महानगरपालिकेने शहरातील विविध भागांतील झोपडपट्टी वसाहतींचा अधिकृत ताळेबंद सादर करून सहकार्य करावे, अशी विनंतीही निवेदनात करण्यात आली आहे. सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून गरजू नागरिकांना कायमस्वरूपी निवारा उपलब्ध करून देण्याचा संस्थेचा मानस असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

यासंदर्भात जिल्हा प्रशासनाने न्याय्य व तातडीने कार्यवाही करावी, अशी आग्रही मागणी संस्थेच्या वतीने करण्यात आली आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# धाराशिवमध्ये पशुसंवर्धन विभागाचा उपक्रम: ५ दिवसीय ऑनलाईन कुक्कुटपालन प्रशिक्षणास ८६ जणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

धाराशिव (जिमाका) जिल्ह्यात कुक्कुटपालन व्यवसायाला मोठी बाजारपेठ व भरपूर वाव उपलब्ध असून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी पशुसंवर्धन विभाग सातत्याने प्रयत्नशील आहे.या पार्श्वभूमीवर सघन कुक्कुट विकास गट,धाराशिव यांच्या वतीने २३ फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत आयोजित पाच दिवसीय 'ऑनलाईन' कुक्कुटपालन प्रशिक्षण यशस्वीरित्या संपन्न झाले.या प्रशिक्षणाद्वारे जिल्ह्यातील तरुण आणि पशुपालकांना व्यावसायिक कुक्कुटपालनाचे तंत्रशुद्ध ज्ञान देण्यात आले.

प्रशिक्षणाचा उदघाटन कार्यक्रम डॉ. धनंजय महाजन,उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, धाराशिव तसेच डॉ.मनोज घाटे, उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय,परभणी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

**विविध क्षेत्रातील प्रशिक्षणार्थ्यांचा सहभाग**

सध्याच्या बेरोजगारीच्या पार्श्वभूमीवर शेतीपूरक व्यवसायाकडे वाढता कल दिसून येत असून या प्रशिक्षणास मोठा प्रतिसाद मिळाला. सुशिक्षित बेरोजगार युवक-युवती,विविध शाखांचे महाविद्यालयीन विद्यार्थी, महिला बचत गटातील सदस्या तसेच प्रगतशील पशुपालक अशा एकूण ८६ प्रशिक्षणार्थ्यांनी नोंदणी करून प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

**तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन**

प्रशिक्षणादरम्यान केवळ तात्विक माहिती न देता अनुभवी तज्ज्ञांनी व्यावहारिक अडचणींवरही सविस्तर मार्गदर्शन केले.त्यामध्ये डॉ.मंगेश वडे (सहयोगी प्राध्यापक,पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय,अकोला) यांनी गावरान/देशी कुक्कुटपालन कसे करावे याविषयी मार्गदर्शन केले.

डॉ.दीपक औताडे (मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र,पुणे) यांनी अंडी उबवणूक केंद्राचे व्यवस्थापन व तांत्रिक बाबी स्पष्ट केल्या.डॉ.लोकेश नागदिवटे (बदक पैदास केंद्र, गडचिरोली) यांनी जिल्ह्यासाठी नवीन असलेल्या 'बदक पैदास' व्यवसायाबाबत माहिती दिली.

डॉ.अंगद बनकर (Kwality -nimal Feeds Pvt. Ltd., बेलगावी) यांनी करार पद्धतीने केल्या जाणाऱ्या कुक्कुटपालनाचे फायदे सांगितले.डॉ.प्राजक्ता कुलकर्णी (कुक्कुट प्रकल्प,परभणी) यांनी लेयर व्यवस्थापनावर सविस्तर चर्चा केली.डॉ.स्वप्नील जिंतपुरे (पशुवैद्यकीय चिकित्सालय,उपळा) यांनी मांसाल कुक्कुटपालन, कोंबड्यांचे लसीकरण व जैव सुरक्षा (Biosecurity) याबाबत मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणाच्या सांगता समारंभात डॉ. धनंजय महाजन यांच्या हस्ते प्रशिक्षणार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की,केवळ प्रशिक्षण घेऊन थांबू नका,तर मिळालेल्या तंत्रज्ञानाचा वापर करून स्वतःचा यशस्वी उद्योग उभारा. विभागातर्फे सर्वतोपरी सहकार्य केले जाईल.

कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन सघन कुक्कुट विकास गटाचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.वैभव पाटील यांनी केले.त्यांनी कुक्कुट व्यवसायासाठी आवश्यक विविध परवाने,शासकीय योजना व बँक कर्जाबाबत मार्गदर्शन केले आणि उपस्थितांचे आभार मानले.या प्रशिक्षणामुळे जिल्ह्यात कुक्कुटपालन क्षेत्रात नवीन उद्योजक निर्माण होण्यास मोठी गती मिळणार आहे.

# अमेरिका - इराण युद्धाचा फटका, उमरगा येथील दोन वयस्कर दांपत्ये दुबई येथे अडकली!



उमरगा (प्रतिनिधी)- अमेरिका इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्षाने भयानक युद्धजन्य स्वरूप धारण केले असून, जगभरात भीती व चिंतेचे वातावरण पसरले आहे. या अस्थिर परिस्थितीचा परिणाम आंतरराष्ट्रीय विमानसेवेवर झाला असून, अनेक उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. अमेरिका इस्रायल आणि इराण यांच्यातील भयानक संघर्षाच्या पार्श्वभूमीवर उमरगा येथील दोन दांपत्य सध्या दुबई येथे अडकले आहेत.

शहरातील आदर्श महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य शिवानंद दळगडे, सुजाता दळगडे तसेच महाबीज कंपनीचे सेवानिवृत्त कृषी अधिकारी शिवानंद माशाळकर व मीनाक्षी माशाळकर हे सोलापूर येथील एका टुर्स कडून मुंबई येथून पाच दिवसांच्या पर्यटनासाठी २४ फेब्रुवारी रोजी दुबईला गेले होते. त्यांनी तेथील विविध पर्यटनस्थळांना भेटी दिल्या. १ मार्च रोजी भारतात परतण्याचे त्यांचे नियोजन होते. मात्र, इस्रायल-इराण संघर्ष तीव्र झाला आणि भयानक युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली.

अचानक आंतरराष्ट्रीय विमान उड्डाणे बंद करण्यात आली. त्यामुळे दोन्ही दांपत्य दुबईतच अडकले आहे. त्यांनी उमरगा शहरातील या दाम्पत्यांचे मित्र तथा रोटरीचे माजी अध्यक्ष सतीश साळुंखे यांना चित्रफितीद्वारे आपण सुरक्षित असल्याचे सांगितले. तथापि, अनिश्चित काळासाठी मुक्काम वाढल्याने त्यांच्या जवळील आर्थिक तरतूद संपली असल्याचे समजते. राहण्याची तसेच मायदेशी सुरक्षित परतण्याची व्यवस्था करण्यासाठी शासनस्तरावर तातडीने प्रयत्न व्हावेत, अशी मागणी संबंधित दांपत्यांनी व्हिडिओ क्लिप द्वारे केली आहे. या घटनेमुळे त्यांच्या कुटुंबीयांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासनाने त्वरीत मदतीसह सुरक्षित मायदेशात परतण्यासाठी प्रयत्न करावे अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# अवैध मद्य विरोधी कारवाई

भुम(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत साखरबाई रा. कल्याणनगर भुम ता. भुम जि. धाराशिव या दि.०३.०३.२०२६ रोजी भुम बसस्थानक समोर अंदाजे ५०० किंमतीची ५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर सुनिता रा. कल्याणनगर भुम ता. भुम जि. धाराशिव या दि.०३.०३.२०२६ रोजी भुम बसस्टेडचे मुतारीजवळ अंदाजे ५०० किंमतीची ५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर नानीबाई रा. कल्याणनगर भुम ता. भुम जि. धाराशिव या दि.०३.०३.२०२६ रोजी भुम बसस्टेडचे समोर अंदाजे ५०० किंमतीची ५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर हिराबाई रा. एमएससीबी ऑफीसचे जवळ भुम ता. भुम जि. धाराशिव या दि.०३.०३.२०२६ रोजी राहते घरासमोर मोकळ्या जागेत अंदाजे ८०० किंमतीची ८ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये भुम पो ठाणे येथे स्वतंत्र ४ गुन्हे नोंदविले आहेत.

तसेच उमरगा पोलीस ठाणे अंतर्गत अशोक रा. चिंचनसुर ता. आळंद ह.मु. कसगी ता. उमरगा जि. धाराशिव हे दि.०३.०३.२०२६ रोजी आपल्या शेतात पत्र्याचे शेडसमोर अंदाजे २,००० किंमतीची २० लिटर सिंधी ताडी अम्ली द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये उमरगा पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

# प्राण्यांचे मांस जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- परंडा पोलीस ठाणे अंतर्गत इम्रान रा. कुरेशी गल्ली परंडा ता. परंडा जि.धाराशिव यांनी दि. ०३.०३.२०२६ रोज कुरेशी गल्ली परंडा येथे अवैध कत्तल केलेले गोवंशीय जनावराचे १२५ चमडे असे एकुण २६,४०० किंमतीचा मुद्देमालासह परंडा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द कलम ५(क), ९, ९(अ) पशु संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# पंप बंद पडल्याने पाणीपुरवठा विस्कळीत

## पदाधिकाऱ्यांनी पाहणी करून घेतला आढावा



भूम (प्रतिनिधी)- शहरातील पाणीपुरवठा व्यवस्थेतील गंभीर त्रुटी पुन्हा एकदा उघड झाल्या आहेत. प्रशासकीय काळात तब्बल ७० लाख ३९ हजार ६२ रुपये खर्च झाल्याचा दावा केला जात असताना, शहराला पाणीपुरवठा करणारी दुसरी मोटार गेली पाच वर्षे दुरुस्तच न केल्याची बाब समोर आली आहे. परिणामी, २८ फेब्रुवारी रोजी पहाटे ५ वाजता पर्यायी मोटारीचा अचानक बिघाड झाला आणि शहरातील अनेक भागांचा पाणीपुरवठा ठप्प झाला.

या घटनेमुळे प्रशासनाच्या आर्थिक नियोजनासह देखभाल व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मोठा निधी खर्च करूनही पर्यायी यंत्रणा सक्षम न ठेवणे ही अत्यंत चिंताजनक बाब असल्याची प्रतिक्रिया नागरिकांतून उमटत आहे. घटनेची माहिती मिळताच पाणीपुरवठा सभापती नवनाथ रोकडे यांनी नगरसेवकांसह वंजारवाडी तलाव परिसरातील जॅकवेल येथे धाव घेतली.

जनशक्ती नगर विकास आघाडीचे गटनेते रुपेश शेंडगे, नगरसेवक आबासाहेब मस्कर व चंद्रमणी गायकवाड यांनी पाहणी करून संबंधित कर्मचाऱ्यांकडून माहिती घेतली. तातडीने दुरुस्ती करून पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे निर्देश देण्यात आले. बिघाड झालेल्या मोटारीची देखभाल करणाऱ्या मेकॅनिकचे सुमारे १ लाख ४० हजार रुपयांचे बिल प्रलंबित असल्याने त्यांनी सुरुवातीला घटनास्थळी जाण्यास टाळाटाळ केल्याचे उघड झाले.

अखेर पदाधिकाऱ्यांच्या हस्तक्षेपानंतर दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले. गटनेते रुपेश शेंडगे म्हणाले, पाणीपुरवठ्यासारख्या अत्यावश्यक सेवेत निष्काळजीपणा होत असेल, तर ते शहरासाठी धोकादायक आहे. नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी आम्ही स्वतः पुढाकार घेतला. जबाबदारी निश्चित करून भविष्यात अशी परिस्थिती उद्भवू देणार नाही. दरम्यान, नगरपरिषदेत प्रशासकीय काळात पाणी पुरवठ्यासाठी झालेल्या खर्चाचा सविस्तर लेखाजोखा नगरसेवक आबासाहेब मस्कर यांनी जॅकवेल येथे वाचून दाखवला.

# एसटीच्या 'शिवनेरी' ची झेप आता मुंबई-पुण्याच्या पलीकडे! - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची घोषणा



मुंबई (प्रतिनिधी)- मुंबई-पुणे महामार्गाची 'राणी' म्हणून ओळख मिळवलेल्या एसटीच्या अत्याधुनिक, आरामदायी आणि सुरक्षित 'शिवनेरी' बस सेवेची झेप आता राज्यभर घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. लवकरच मुंबई-पुणे मार्गाच्या पलीकडे महाराष्ट्रातील प्रमुख शहरांदरम्यान शिवनेरी धावणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

सन २००२ मध्ये सुरू झालेल्या शिवनेरी सेवेने वक्तशीरपणा, उत्कृष्ट आसनव्यवस्था आणि सुरक्षित प्रवास या गुणवैशिष्ट्यांमुळे उच्च मध्यमवर्गीय प्रवाशांचा विश्वास जिंकला. इतर बससेवेपेक्षा तिकीटदर थोडे अधिक असतानाही सातत्याने मिळणाऱ्या उत्तम प्रतिसादामुळे ही सेवा सुरुवातीपासूनच नफ्यात आहे, असे मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले.

**२०० अत्याधुनिक व्होल्व्हो बसांची खरेदी**

राज्यभर विस्तारासाठी २०० नवीन अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त व्होल्व्हो बसेस खरेदी करण्याची निविदा प्रक्रिया सुरू आहे. या बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल होताच, मुंबई-पुणेप्रमाणेच इतर महत्त्वाच्या शहरांदरम्यानही शिवनेरी सेवा सुरू होईल.

**प्रस्तावित मार्गांमध्ये**

नाशिक-पुणे, नाशिक-छत्रपती संभाजीनगर, नाशिक-जळगाव-धुळे, पुणे-कोल्हापूर, पुणे-सांगली, पुणे-सोलापूर, नागपूर-चंद्रपूर, नागपूर-अमरावती-अकोला अशा प्रमुख शहरांचा समावेश आहे. त्यामुळे राज्याच्या विविध भागांतील प्रवाशांना आलिशान, सुरक्षित आणि विश्वासार्ह प्रवासाचा पर्याय उपलब्ध होणार आहे.

**ई-बस सेवेलाही उत्तम प्रतिसाद**

सध्या दादर-स्वारगेट, दादर-शिवाजीनगर, बोरीवली-स्वारगेट, बोरीवली-शिवाजीनगर, ठाणे-स्वारगेट आणि ठाणे-शिवाजीनगर या मार्गांवर पर्यावरणपूरक ई-शिवनेरी बस सेवा सुरू असून प्रवाशांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

**ज्येष्ठ व महिलांसाठी सवलती**

महिला प्रवाशांना तसेच ६५ ते ७५ वयोगटातील ज्येष्ठ नागरिकांना तिकीटदरात ५० टक्के सवलत, तर ७५ वर्षांवरील ज्येष्ठांना शिवनेरी प्रवास पूर्णपणे विनामूल्य आहे. त्यामुळे नव्या मार्गांवरही मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळेल, असा विश्वास मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केला.

**३० 'स्लिपर शिवनेरी'ची भर**

नवीन २०० बसेसमध्ये ३० शयनयान (स्लिपर) बसेसचा समावेश असेल. सध्या ज्या मार्गांवर विना-वातानुकूलित शयनयान बससेवा आहे, त्या ठिकाणी 'स्लिपर शिवनेरी' सुरू करून प्रवासी सेवेला अधिक उन्नत रूप दिले जाणार आहे. आरामदायी बेड-कोच सुविधा, सुरक्षितता आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे दीर्घ पल्ल्याच्या प्रवासात प्रवाशांना नव्या अनुभवाची हमी मिळणार आहे.

'शिवनेरी'चा हा विस्तार म्हणजे केवळ बससेवेची वाढ नव्हे, तर महाराष्ट्राच्या प्रगत आणि गतिमान प्रवाससंस्कृतीची नवी दिशा आहे.असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

# रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा वाढता प्रतिसाद

(धाराशिव / प्रतिनिधी) कोरोना काळापासून अनेक महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचे प्रमाण खूपच कमी झालेले आहे. शिक्षणापासून विद्यार्थी उदासीन झालेला आहे. अशा परिस्थितीमध्ये रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा तासिकेला आणि विविध उपक्रम व कार्यक्रमांना खूप मोठा प्रतिसाद असल्याचे दिसून येते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संदीप देशमुख यांनी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीसाठी अनेक मार्गांचा अवलंब करून विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढवून सर्व तासिका पूर्ण कशा होतील याकडे लक्ष दिले आहे. विद्यार्थ्यांच्या करिअरच्या दृष्टीने महत्त्वाचे असणारे उपक्रम महाविद्यालय मध्ये प्रभावीपणे राबवलेले आहेत. चॅट जीपीटी , ए.आय कार्यशाळा , शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांच्यावरील कार्यशाळा , अशा विविध कार्यशाळा विद्यापीठ स्तरावरील मंजूर करून त्या प्रभावीपणे राबवलेल्या आहेत. महाविद्यालयामध्ये दत्तक योजना प्रभावीपणे राबवून विद्यार्थ्यांच्या उपस्थितीकडे लक्ष केंद्रित केले आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना आकर्षित करणारे आणि त्यांच्या करिअरसाठी उपयुक्त असणारे सर्व उपक्रम राबवण्यावर मोठा भर दिला आहे. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ होण्यासाठी कनिष्ठ विभागातील अकॅडमी असेल, शैक्षणिक सहल असेल, पारंपरिक वेशभूषा दिन साजरा करणे ,विद्यार्थ्यांच्या तासिका होत आहेत की नाही यावर काटेकोरपणे लक्ष ठेवणे असेल,कोणताही विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून आणि एबीसी सवलतीपासून वंचित राहणार नाही. महाविद्यालयामध्ये आल्यानंतर तो रिकाम्या हाताने घरी परत जाणार नाही यासाठी प्राचार्य डॉ.संदीप देशमुख यांनी खूप मोठे प्रयत्न केले आहेत. आणि म्हणून अशा परिस्थितीमध्ये रामकृष्ण परमहंस महाविद्यालय विद्यार्थ्यांनी गजबजुन गेल्याचे दिसते.

प्रत्येक उपक्रमात विद्यार्थी खूप मोठ्या संख्येने भाग घेताना दिसतात. अशा अनेक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची उपस्थिती खूप मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे.

**लातूर समाचार धाराशिव**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**

**9175325708**

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649